RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड . सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

**दि. ५ मे 2026**



1950- धर्मांतरासंबंधी पत्रकारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मुलाखत घेतली.
1923- मध्यप्रांत व-हाड महार परिषदेचे 12 वे अधिवेशन धुगाव जि. अमरावती. संकलन प्रा. यशवंत दुपटे

मंगळवार, ५ मे २०२६ | वर्ष : ६ | अंक : १२५ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Tuesday, 5 May 2026 | Year : 6 | Issue : 125 | Daily | Rate: Rs. 5/-

# पाच राज्यांचे निकाल
## कोणी काय गमावले काय कमावले



**नवी दिल्ली :** भाजपाने आसाम आणि पश्चिम बंगाल जिंकले. पुद्दुचेरीत सत्तांधारी आघाडीत भाजपा आहे. पण, देशातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसला या विधानसभा निवडणुकांमध्ये किती यश मिळाले ? तर केरळची सत्ता मिळवण्यात काँग्रेस यशस्वी ठरली आहे. पश्चिम बंगालमध्ये गेल्यावेळी एकही जागा न जिंकलेली काँग्रेस दोन जागांवर आघाडीवर आहे.

केरळात काँग्रेस आघाडी विरुद्ध डावी आघाडी अशीच लढत होती. तिथे काँग्रेसने चांगली कामगिरी करत डाव्या लोकशाही आघाडीला सत्तेतून खाली खेचले आहे. साडेपाचपर्यंतच्या निवडणूक आयोगाच्या निकालानुसार, काँग्रेसने केरळमध्ये 55 जागा जिंकल्या, तर 8 जागांवर आघाडीवर आहे.

आसाममध्ये काँग्रेसला सत्ता मिळण्याची आशा होती. पण, भाजपाने विजयाची हॅट ट्रिक केली. मोठे यश अपेक्षित असलेल्या काँग्रेसला आसाममध्ये 20 जागा मिळण्याचीच शक्यता आहे. कारण 20 जागांवरच त्यांचे उमेदवार आघाडीवर आहेत.

दुसरीकडे तामिळनाडूमध्ये काँग्रेसची कामगिरी इतकी चांगली राहिली नाही. काँग्रेसने एक जागा जिंकली असून, चार जागांवर आघाडीवर आहे. पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. तृणमूल काँग्रेसच्या झंझावातात मागच्या वेळी शून्यावर आलेल्या काँग्रेसच्या पदरात दोन जागा पडण्याची अंदाज आहे. तिथे दोन मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार आघाडीवर आहेत.

### आसाममध्ये पुन्हा 'हिमंता'!

**नवी दिल्ली :** सर्व देशाचे लक्ष लागलेल्या आसाम विधानसभा निवडणुकीत भाजपा हॅटट्रिकच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे. निकालाच्या सुरुवातीच्या कलांनुसार भारतीय जनता पार्टी 78 जागांवर आघाडीवर आहे. विधानसभेच्या 126 जागांसाठी बहुमतासाठी 64 जागांची आवश्यकता आहे. सुरुवातीचे कल पाहता भाजपा स्पष्ट बहुमताच्या दिशेने वाटचाल करत असून, हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा सरकार स्थापन होईल असा एक्झिट पोलमध्ये वर्तविण्यात आलेला अंदाज खरा होताना दिसत आहे. निवडणूक आयोगाच्या अधिकृत आकडेवारीनुसार, भारतीय जनता पार्टी 78 जागांवर आघाडीवर असून, काँग्रेसने 24 जागी आघाडी घेतली आहे. बोडोलँड पीपल्स फ्रंट 10 जागांवर पुढे आहे तर, आसा गण परिषद पक्षाचे 9 उमेदवार आघाडीवर आहेत. याशिवाय एआययुडीए 02 आणि रायजोर दर (एरजेआरडी) 02 जागी आघाडीवर आहे. याशिवाय, 'आसाम गण परिषद'चे उमेदवार राजन गोहेन हे देखील पिछाडीवर असून त्यांना पराभवाचा सामना करावा लागतो आहे. या निवडणुकीत राजन गोहेन यांना 50 हजार 714 मते मिळाली असून 31 हजार 483 मतांनी पिछाडीवर आहेत. तसेच, राजन गोहेन यांच्या विरोधातील भाजप उमेदवार जितू गोस्वामी हे आघाडीवर असून त्यांना 82 हजार 197 मते मिळाली आहेत. दरम्यान, आसाम विधासभा निवडणुकीचा निकाल जवळपास स्पष्ट झाला आहे. भाजपने पुन्हा एकदा विजयाची हॅट-ट्रीक आसाममध्ये लावली आहे. आसाममध्ये पुन्हा एकदा हिमंता राज आल्याचे पाहायला मिळते आहे.

तमिळनाडूत मोठा उलटफेर!

### अभिनेता विजयच्या पक्षाचा ऐतिहासिक विजय



**तमिळनाडू :** सगळ्या देशाचे लक्ष लागून असलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीला आज सकाळी आठ वाजेपासून सुरुवात झाली. मतमोजणीच्या प्राथमिक कलांनुसार, पश्चिम बंगाल व आसाममध्ये भाजपा, केरळमध्ये काँग्रेसप्रणीत यूडीएफ आघाडी आणि तमिळनाडूत अभिनेता विजय याचा **'तमिलगा वेत्री कळघम'** पक्ष आघाडीवर असल्याचे दिसून आले. जेमतेम दीड वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या विजय याचा पक्षाने राज्यात मोठी मुसंडी मारल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. त्यापाठोपाठ भाजपाचा मित्रपक्ष असलेल्या अण्णाद्रमुक दुसऱ्या क्रमांकाच्या जागांवर आघाडीवर आहे, तर सध्या राज्याच्या सत्तेत असलेला द्रमुक पक्ष तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला आहे. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या कलांमध्ये सर्वात धक्कादायक कल हे तमिळनाडूमधून समोर आले आहेत. निवडणूक आयोगाने दुपारी साडेबारापर्यंत जाहीर केलेल्या मतमोजणीच्या आकडेवारीनुसार, राज्यातील 234 जागांपैकी तब्बल 109 जागांवर अभिनेता विजय याच्या पक्षाने आघाडी मिळवली आहे.

### दीदीं'चा 15 वर्षांचा गड कोसळला!



**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या राजकारणात ममता बॅनर्जी यांचा पराभव हा केवळ एका निवडणुकीचा निकाल नाही; तो एका दीर्घ, संघर्षमय आणि वादळी राजकीय प्रवासातील सर्वात निर्णायक वळण ठरले आहे. तब्बल 15 वर्षांच्या सत्तेनंतर 'ममतादीदी' पराभवाच्या गर्तेत सापडलेल्या दिसतात. 1970 च्या दशकात, आणीबाणीविरोधी आंदोलनाच्या काळात, एक तरुणी कोलकात्यातील रस्त्यावर गोंधळात अचानक एका कारच्या बोनटवर चढली. ती कार होती Jayaprakash Narayan यांची. त्या क्षणाने ममतांच्या राजकीय आयुष्याचा सूर ठरवला. व्यवस्थेविरुद्ध उभे राहण्याची हिंमत दाखविणारी तरुण राजकीय नेता म्हणून ती पुढे आली. हा प्रसंग फक्त धाडसाचा नव्हता; तो 'स्टेज' ओळखण्याच्या त्यांच्या नैसर्गिक क्षमतेचा दाखला होता. गर्दी कुठे आहे, नेमका क्षण कोणता आणि त्याला वेगळा प्रतिकात्मक अर्थ कसा द्यायचा, हे ममतांना तेव्हाच उमगले होते. रस्त्यावर अनवाणी मुलांना पाहून त्यांनी तात्काळ विद्यार्थ्यांना चप्पल वाटप योजना सुरू करण्याचा आदेश दिला होता, पण हीच शैली कधी अडथळा ठरते. राज्य नागरी सेवेतील सुधारणा प्रकल्प त्यांनी अचानक थांबवला आणि त्यानंतर तो पुन्हा सुरू झालाच नाही. त्यांच्या निर्णयप्रक्रियेत 'भावना' आणि 'प्रेरणा' यांचा मोठा वाटा असतो. हेच दोन मुद्दे त्यांच्या राजकारणाची ताकद आणि मर्यादा ठरले.

### सुवेंदू अधिकारी: बंगालच्या राजकारणातील 'जायंट किलर' नेता

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस विरुद्ध भाजपा अशी अटीतटीची लढत झाली. मुख्यत्वे भवानीपूर मतदारसंघात ममता बॅनर्जी आणि भाजपाचे सुवेंदू अधिकारी यांची लढत लक्षवेधी ठरली. अवघ्या देशाचे लक्ष या जागेवर होते. निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळानुसार, सध्या ममता बॅनर्जी आघाडीवर आहेत. मतमोजणी प्रक्रिया सुरू झाल्यापासून या दोन्ही उमदेवारांमध्ये टफ फाईट राहिली. सुरुवातीच्या कलांमध्ये सुवेंदू अधिकारी पुढे होते, तर आता ममता बॅनर्जी यांनी मुसंडी मारली आहे. दरम्यान, सुवेंदू अधिकारी यांनी दोन मतदारसंघातून निवडणूक लढवली. त्यांच्या पारंपरिक नंदिग्राम मतदारसंघातूनही ते उभे असून तिथे ते आघाडीवर आहेत. त्यामुळे दोन्हींपैकी कोणत्याही जागेवरून ते निवडून येण्याची शक्यता आहे. तसंच, पश्चिम बंगालमध्ये भाजपाची सत्ता आल्यास सुवेंदू अधिकारी यांची मुख्यमंत्री पदाच्या नावासाठी चर्चा आहे.

### अभिषेक बॅनर्जींची पहिली प्रतिक्रिया



पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या निकालांनी संपूर्ण देशाला धक्का दिला आहे. गेल्या 15 वर्षांपासून सत्तेत असलेल्या तृणमूल काँग्रेसला मतदारांनी घरचा रस्ता दाखवला असून भाजपने बहुमताचा आकडा पार केला आहे. या पराभवानंतर तृणमूलचे सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांचे पुतणे आणि पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांनी **'जनतेचा निकाल स्वीकारत असल्याचे'** म्हटले आहे. निकाल स्पष्ट झाल्यानंतर माध्यमांशी बोलताना अभिषेक बॅनर्जी म्हणाले, 'लोकशाहीत जनतेचा जो काही कौल असतो, तो सर्वांनी स्वीकारलाच पाहिजे. मात्र, यावेळी मतमोजणीची प्रक्रिया कमालीची संथ आहे. 2021 मध्ये केवळ 8-9 तासांत 90 टक्के मोजणी पूर्ण झाली होती, पण आज त्याच वेळेत केवळ 6 ते 8 फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत. हे असामान्य आहे. अभिषेक बॅनर्जी यांनी टीएमसीच्या कार्यकर्त्यांना आणि काऊंटिंग एजंट्सना धीर धरण्याचे आवाहन केले आहे. कुठल्याही परिस्थितीत मतमोजणी केंद्र सोडू नका. अनेक ठिकाणी निकाल जाहीर करण्यास उशीर केला जात आहे. बर्धमान दक्षिणमध्ये आम्ही जिंकलेलो असतानाही पुन्हा मतमोजणी केली जात आहे, तर कल्याणीमध्ये ईव्हीएम डेटा आणि फॉर्म 17सी मध्ये तफावत आढळली आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

## महत्त्वाच्या बातम्या

### आठ दिवसांपासून आपले सरकार पोर्टल ठप्प

**पचखेडी :** महाराष्ट्र शासनाने लोकाभिमुख प्रशासनाचे स्वप्न दाखवत सर्व सेवा ऑनलाईन केल्या असल्या, तरी गेल्या आठ दिवसांपासून आपले सरकार या मुख्य पोर्टलचे सर्व्हर पूर्णपणे कोलमडले आहे. या तांत्रिक बिघाडामुळे ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांचे जगणे कठीण झाले असून, विदर्भातील 44 अंश सेल्सिअस तापमानात दाखल्यांसाठी तहसील आणि सेतू केंद्रांवर चकरा मारण्याची वेळ जनतेवर आली आहे. विशेषतः शैक्षणिक प्रवेशासाठी लागणाऱ्या कागदपत्रांअभावी विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या 27 एप्रिलपासून महाऑनलाइन आणि आपले सरकार या संकेतस्थळांच्या मुख्य सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झाला आहे. यामुळे उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, नॉन-क्रिमीलेअर यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या दाखल्यांसाठी अर्ज करणे अशक्य झाले आहे. ज्या नागरिकांनी याआधीच अर्ज केले होते, त्यांचे दाखले मंजूर होऊनही केवळ सर्व्हर बंद असल्याने ते डाऊनलोड करता येत नाहीत.

### बिग बाजार आणि टाकळी परिसरात आज 4 तास वीज नाही

**नागपूर :** महावितरणच्या महाल आणि सिव्हिल लाईन्स विभागांतर्गत येणाऱ्या विविध उपकेंद्रांमध्ये तातडीची देखभाल, दुरुस्ती आणि नवीन वीज खांब उभारण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांमुळे मंगळवार, 5 मे रोजी शहरातील अनेक महत्वाच्या भागांतील वीज पुरवठा सकाळी 7 ते 11 या वेळेत बंद राहणार आहे. महाल विभागातील वाठोडा वीज वितरण केंद्रांतर्गत '11 केव्ही बिग बाजार' वाहिनीवर नवीन खांब उभारले जाणार आहेत. त्यामुळे वैष्णोदेवी नगर चौक, सेंट्रल एव्हेन्यू रोड परिसर, बाभुळबनचा काही भाग, आंबेडकर चौक, जगजीवनराम नगर, छापरूनगर आणि दवाई कारखाना या परिसरात चार तास वीज खंडित असेल. दुसरीकडे, सिव्हिल लाईन्स विभागातील पुरुषोत्तम बाजार, मानसरोवर, वेलकम सोसायटी आणि झिंगाबाई टाकळी या परिसरातील नागरिकांनाही सकाळी 7 ते 11 दरम्यान वीज कपातीचा सामना करावा लागणार आहे. उन्हाळ्याचे दिवस पाहता, नागरिकांनी सकाळीच आपली महत्त्वाची कामे आटोपून घ्यावीत आणि महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## केरळमध्ये काँग्रेस आघाडीचा विजय, डाव्यांचा शेवटचा गडही ढासळला

केरळमध्ये सत्ताबदल होत असल्याचे दिसत आहे. काँग्रेसप्रणीत यूडीएफ आघाडीने केरळमध्ये 84 जागांवर आघाडी घेतली असून बहुमताचा आकड्याच्या पुढे ही संख्या पोहोचली आहे. तर सत्ताधारी एलडीएफची 41 जागांवर आघाडी आहे. भाजपाला केवळ एका जागेवर आघाडी घेता आली.



### डाव्यांचा शेवटचा गड ढासळला

डाव्या पक्षांनी पश्चिम बंगालमध्ये 1977 ते 2011 मध्ये एकहाती सत्ता गाजवली. त्रिपुरा राज्यात 1993 ते 2018 या काळात सत्ता स्थापन केली. तसेच केरळमध्ये यूडीएफ आणि एलडीएफ यांची आलटून पालटून सत्ता येत होती. 2021 ची निवडणूक अपवाद ठरली. या निवडणुकीत पिनराई विजयन यांच्या नेतृत्वाखाली डाव्या आघाडीने सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवली. केरळमधील डाव्यांची सत्ता जाणे म्हणजे आता देशभरात एकाही राज्यात त्यांचे सरकार नसेल.

### एकाही राज्यात सत्ता नाही

1977 नंतर प्रथमच भारतात एकाही राज्यात डाव्यांची सत्ता नसणार आहे. 2016 साली पिनराई विजयन यांच्या नेतृत्वाखालील एलडीएफचे सरकार केरळमध्ये स्थापन झाले होते. 1977 नंतर देशात एकही कम्युनिस्ट मुख्यमंत्री नसणार आहे. यामुळे डाव्यांचा राष्ट्रीय राजकारणातील प्रभाव कमी होईल, असे सांगितले जाते. 2004 साली भारतात डाव्यांनी चांगली मुसंडी मारली होती. मात्र त्यानंतर झालेल्या 2009 च्या लोकसभा निवडणुकीपासून डाव्या पक्षांची देशभरात घसरण पाहायला मिळाली. 2004 साली डाव्या पक्षांचे 59 खासदार निवडून आले होते. यूपीए सरकारच्या पहिल्या कालखंडात डाव्या पक्षांचा महत्त्वाचा सहभाग होता. त्यातही सीपीएमचे 43 खासदार होते. मात्र 2009 च्या लोकसभा निवडणुकीत डाव्या पक्षांचे केवळ 24 खासदार निवडून येऊ शकले. 2014 मध्ये 10 आणि 2019 च्या निवडणुकीत फक्त 5 खासदार निवडून आले. 2014 च्या निवडणुकीत सीपीएम आणि सीपीआयचे मिळून सहा खासदार आहेत.

# दीक्षाभूमीवर 6-7 मे रोजी विश्व शांती बौद्ध संमेलन

### विश्व शांति बौद्ध संमेलन 2026 व भदंत शांतरक्षित महाथेरो यांचा 80 वा वाढदिवस सोहळा

**नागपूर :** बुद्ध पौर्णिमेनिमित्त दिक्षाभूमी, नागपूर येथे विश्व शांति बौद्ध संमेलन 2026 आणि भदंत शांतिरक्षित महाथेरो यांचा 80 वा वाढदिवस तसेच भिक्खु जीवनातील त्यांचे 45 वर्ष पूर्ण होत असल्या निमित्त भव्य रूपात सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा दोन दिवसीय कार्यक्रम बुधवार दि. 6 मे 2026 व गुरुवार दि. 7 मे 2026 रोजी संपन्न होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात, बुधवार दि. 6 मे 2026 रोजी सायंकाळी 4.00 वाजता उद्घाटन समारोहाने होईल. या कार्यक्रमाचे उद्घाटन भंते आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी भंते प्रज्ञादीप (चीफ सेक्रेटरी, अखिल भारतीय भिक्खु संघ) विराजमान राहतील तर संजय पाटील (डायरेक्टर, मैत्रेय डेवलपर्स) यांचा मुख्य अतिथी म्हणून सहभाग असेल. याशिवाय विविध देशातील अंतरराष्ट्रीय भिक्खु व सन्माननीय उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित राहतील.

सायंकाळी 4.30 वाजता चित्रकला व निबंध स्पर्धा होईल. या कार्यक्रमाचे उद्घाटन इंजि. रजत बी. चंद्रिकापुरे यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी सामाजिक न्याय विभाग चे उप-आयुक्त मा. डॉ. सिद्धार्थ गायकवाड हे असतील तर नागपूर चे आर्ट आणि क्राफ्ट टीचर शरद रंगारी व विवेक अवतारे यांचा प्रमुख अतिथी म्हणून सहभाग असेल.





**गुरुवार दि. 7 मे** 2026 रोजी सकाळी 7.00 वाजता दीक्षाभूमि परिसरात बुद्ध जयंती रैली काढण्यात येईल.
सकाळी 9.30 वाजता महासंघासाठी संघदान व भदंत शांतरक्षित महाथेरो यांचा 80 वा वाढदिवस सोहळा होईल.
सकाळी 11.30 वाजता भिक्खु संघ व पाहुण्यांचे भोजनदान करण्यात येईल.
दुपारी 2.00 वाजता इंटरनेशनल बुद्धिस्ट कांफ्रेंस फॉर वर्ल्ड पीस 2026 भरवण्यात येणार आहे.

त्यानंतर सायंकाळी 6.30 वाजता सन्माननीय अखिल भारतीय भिक्खु संघ यांचे कडून पूजा-वंदना व परित्राण पाठ घेण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन दीक्षाभूमी स्मारक समिती, नागपूरचे अध्यक्ष भंते आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी भंते प्रज्ञादीप महाथेरो (चीफ सेक्रेटरी, अखिल भारतीय भिक्खु संघ) विराजमान राहतील तर संजय पाटील (डायरेक्टर, मैत्रेय डेवलपर्स) यांचा मुख्य अतिथी म्हणून सहभाग असेल. याशिवाय विविध देशातील अंतरराष्ट्रीय भिक्खु व सन्माननीय उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित राहतील.

*भिक्खु धम्मांकर बोधि व अखिल भारतीय भिक्खु संघचे पदाधिकारी भिक्खू गण व डॉ. अभिजीत बरुआ यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. दोन्ही दिवशी होणाऱ्या या पावन व शांतीपूर्ण कार्यक्रमात बौद्ध धर्मप्रेमी, संघातील सदस्य, उपासक-उपासिका व सर्व नागरिकांनी अधिकाधिक संख्येने सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन इंटरनेशनल बुद्धिस्ट कांप्रेंस आणि बुद्ध पूर्णिमा सेलिब्रेशन कमिटी 2026, दिक्षाभूमी, नागपूर. करण्यात येत आहे.*



"जे मिळाले त्यात समाधान ठेवा.
पण स्वप्नं मात्र मोठी ठेवा..."

बहुजन सौरभ

# संपादकीय

## सुरक्षितता कुठे?

महाराष्ट्रात अलीकडच्या काळात घडलेल्या बदलापूर, पुणे आणि नरसापूर येथील घटनांनी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा तीव्रतेने समोर आणला आहे. या घटना केवळ वेगवेगळ्या गुन्ह्यांच्या नोंदी नाहीत, तर त्या आपल्या सामाजिक, प्रशासकीय आणि कायदेशीर व्यवस्थेतील गंभीर त्रुटींचे प्रतीक आहेत. एका बाजूला महिलांच्या संरक्षणासाठी कडक कायदे असल्याचे सांगितले जाते, तर दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात महिलांवरील अत्याचार, छेडछाड आणि लैंगिक शोषणाच्या घटना सतत घडत आहेत. त्यामुळे एकच प्रश्न ठळकपणे पुढे येतो. महिलांची सुरक्षितता नेमकी कुठे आहे? बदलापूरमधील अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटना असोत किंवा शाळा व्यवस्थेतील सुरक्षेतील ढिलाई, या घटनांनी समाजात अस्वस्थता निर्माण केली आहे. शाळा ही मुलांसाठी सुरक्षित जागा असावी, हा मूलभूत विश्वासच डळमळीत झाला आहे. जेथे मुलींचे रक्षण व्हायला हवे, तेथेच जर धोका निर्माण होत असेल, तर पालकांचा विश्वास कसा टिकणार? या घटनांमधून स्पष्ट होते की, केवळ नियम बनवणे पुरेसे नसते; त्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे तेवढेच आवश्यक आहे. पुण्यासारख्या प्रगत आणि सुशिक्षित शहरातही महिलांवरील अत्याचाराच्या घटना घडत असतील, तर ती अधिक चिंतेची बाब आहे. आयटी आणि शिक्षणाचे केंद्र म्हणून ओळख असलेल्या या शहरात महिलांना सार्वजनिक ठिकाणी, कार्यस्थळी आणि प्रवासादरम्यान सुरक्षितता मिळत नसेल, तर ही परिस्थिती राज्याच्या विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. शहर मोठे झाले, संधी वाढल्या, पण महिलांच्या सुरक्षिततेची हमी मात्र अजूनही अनिश्चितच आहे. नरसापूरमध्ये घडलेली अमानुष घटना, एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची हत्या, ही तर संपूर्ण समाजाला हादरवून टाकणारी आहे. अशा घटनांनंतर समाजात संताप उसळतो, आंदोलन होतात, कठोर शिक्षेची मागणी केली जाते. पण काही दिवसांनी सगळे शांत होते आणि परिस्थिती पुन्हा पूर्ववत होते. हा चक्रव्यूह तोडणे गरजेचे आहे. प्रत्येक घटनेनंतर प्रतिक्रिया देण्याऐवजी, अशा घटना घडूच नयेत यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. भारतामध्ये महिलांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे अस्तित्वात आहेत. अल्पवयीनांवरील अत्याचार रोखण्यासाठी POCSO कायदा, कार्यस्थळी लैंगिक छळ रोखण्यासाठी POSH कायदा, तसेच फौजदारी कायद्यातील विविध तरतुदी, हे सर्व कागदोपत्री मजबूत दिसतात. मात्र प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी अपुरी पडते. अनेक संस्थांमध्ये Internal Complaints Committee (ICC) केवळ नावापुरती असते. खाजगी क्षेत्रात महिलांना तक्रार करण्याची भीती वाटते, तर असंघटित क्षेत्रात तर कोणतीही संरचना अस्तित्वातच नाही. अंमलबजावणी कमी राहण्यामागील कारणे अनेक आहेत. प्रशासनातील निष्काळजीपणा, तपास प्रक्रियेतील विलंब, पुरावे गोळा करण्यात होणाऱ्या त्रुटी, आणि न्यायालयीन प्रक्रियेतील दीर्घकाळ चालणारी सुनावणी, या सर्व घटकांमुळे गुन्हेगारांना शिक्षा होण्यास उशीर होतो. यामुळे गुन्हेगारांमध्ये भीती राहत नाही आणि गुन्हे पुन्हा घडण्याची शक्यता वाढते. यासोबतच, अनेकदा पीडितेला न्याय मिळवण्यासाठीच लढा द्यावा लागतो, जे स्वतःमध्येच अन्यायकारक आहे. परंतु या समस्येचे मूळ केवळ कायद्यात किंवा प्रशासनात नाही, तर समाजाच्या मानसिकतेतही आहे. अजूनही अनेक ठिकाणी महिलांवर दोष टाकण्याची प्रवृत्ती दिसून येते. त्यांच्या कपड्यांवर, वागणुकीवर किंवा बाहेर पडण्याच्या वेळेवर प्रश्न उपस्थित केले जातात. गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याऐवजी महिलांनाच जबाबदार धरण्याची ही प्रवृत्ती बदलल्याशिवाय परिस्थिती सुधारू शकत नाही. महिलांकडे समान नागरिक म्हणून पाहण्याची आणि त्यांच्या स्वातंत्र्याचा आदर करण्याची गरज आहे. कार्यस्थळी सुरक्षिततेचा प्रश्नही तेवढाच महत्त्वाचा आहे. अनेक महिलांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी मानसिक किंवा शारीरिक छळाचा सामना करावा लागतो. POSH कायद्यांतर्गत तक्रार यंत्रणा असली तरी तिच्यावर विश्वास नसल्यामुळे अनेक प्रकरणे दडपली जातात. यामुळे महिलांच्या स्वावलंबनाच्या मार्गात अडथळे निर्माण होतात. आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी महिलांना घराबाहेर पडावे लागते, पण त्याच वेळी सुरक्षिततेची हमी नसल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास डळमळीत होतो. या पार्श्वभूमीवर उपाययोजना अधिक व्यापक आणि ठोस असणे गरजेचे आहे. सर्वप्रथम, कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, कार्यस्थळे आणि सार्वजनिक ठिकाणी नियमित सुरक्षा तपासण्या (ऑडिट) केल्या पाहिजेत. प्रत्येक जिल्ह्यात फास्ट-ट्रॅक न्यायालयांची संख्या वाढवून प्रकरणांचा जलद निकाल लावला पाहिजे. पोलिस यंत्रणेला अधिक संवेदनशील आणि जबाबदार बनवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासोबतच, महिलांना त्यांच्या हक्कांची आणि कायद्यांची माहिती देणे आवश्यक आहे. तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया सुलभ आणि सुरक्षित असावी. डिजिटल माध्यमांद्वारे आणि सामाजिक उपक्रमांद्वारे जागृती निर्माण केली पाहिजे. तसेच, निष्काळजीपणा करणाऱ्या संस्था आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून उत्तरदायित्व निश्चित करणे गरजेचे आहे. परंतु सर्वात महत्त्वाचा बदल हा समाजाच्या विचारसरणीत व्हायला हवा. शिक्षणाच्या माध्यमातून लहानपणापासूनच लैंगिक समानतेचे मूल्य रुजवले पाहिजे. महिलांचा सन्मान, त्यांच्या स्वातंत्र्याचा आदर आणि समानतेची भावना ही केवळ घोषणांमध्ये न राहता व्यवहारात उतरली पाहिजे. महिलांची सुरक्षितता हा केवळ महिलांचा प्रश्न नाही, तो संपूर्ण समाजाच्या प्रगतीचा आणि संकृतीचा आरसा आहे. बदलापूर, पुणे आणि नरसापूर या घटना आपल्याला सतत इशारा देत आहेत की, व्यवस्था अजूनही अपुरी आहे. आता केवळ संताप व्यक्त करून चालणार नाही; ठोस, सातत्यपूर्ण आणि जबाबदार कृतीची वेळ आली आहे. अन्यथा, 'सुरक्षितता' हा शब्द केवळ कागदावरच राहील आणि वास्तवात महिलांना असुरक्षिततेच्या छायेतच जगावे लागेल. ■■

# करुणा, प्रज्ञा आणि समता

**बौद्ध पत्रकारिता ही केवळ बातम्यांचा संग्रह नाही. सनसनाटी वृतांकन नाही. ती हृदयाची साधना आहे. ज्यात करुणा , प्रज्ञा आणि समता हे तीन घटक आहेत. ते घटक एकत्र येतात. चार आर्यसत्य आणि अष्टांगिक मार्गानंतर ही त्रिसूत्री बौद्ध पत्रकारितेला पूर्णता देते. समृध्द करते. समस्या मार्गी लावण्यास शक्ती देते. यंत्रणांवर प्रभाव टाकते.**

करुणा दुःख पाहून वेदना अनुभवते. त्याचे निराकरण करण्याची तळमळ निर्माण करते. प्रज्ञा त्या दुःखाच्या मुळापर्यंत जाते. अंधार कापते आणि सत्याचा दिवा पेटवते. समता राग, द्वेष किंवा अतिरेकी आसक्ती न ठेवता, सर्व काही समभावाने पाहते. ज्यामुळे पत्रकारिता निष्पक्ष, शांत आणि दीर्घकालीन प्रभावी होते.आजच्या माध्यम जगात द्वेष पसरवणारी भाषा आहे. फेक न्यूज आहेत. एकतर्फी प्रसिद्धी आहे. रेटिंग्ससाठी विकल्या जाणाऱ्या भावनांचे साम्राज्य आहे. येथे बौद्ध पत्रकारिता करुणा, प्रज्ञा आणि समता घेऊन येते. जसे एखाद्या बोधिसत्त्वाने हृदयात करुणा घेऊन अंधारात प्रवेश केला. ही पत्रकारिता प्रभावी असते. कारण ती सत्यावर आधारलेली असते. ती गहन असते. ती परिणामकारक असते . कारण ती केवळ समस्या दाखवित नाही. तर बदल घडवते. वाचकाला प्रेरित करते. ती भावनिक असते कारण ती हृदयाला स्पर्श करते. अश्रु आणते. पण आशा देखील देते. ती साहित्यिक असते. तिची भाषा अमर्याद करुणामय असते. जसे पावसाळ्यात कमळ उमलते. तसेच दुःखातून आशा फुलते. करुणा ही दुःखाच्या वेदनेतून जन्मलेली सक्रिय शक्ती असते. बौद्ध धर्मात करुणा- ही केवळ सहानुभूती नाही. तर दुसऱ्याच्या दुःखाचे निराकरण करण्याची तीव्र इच्छा आहे. ती आई जिच्या आजारी मुलाकडे पाहते तशी आहे. वेदना अनुभवते. पण निष्क्रिय राहत नाही. बौद्ध पत्रकार या करुणेने लिहितो. तो दुःख फक्त 'ट्रॅजिक स्टोरी' म्हणून सादर करत नाही. तर त्यात स्वतःला बुडवतो आणि वाचकालाही बुडवतो.

कल्पना करा. एखाद्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्योची बातमी आहे. सामान्य पत्रकारिता आकडेवारी देईल. रडणाऱ्या विधवांचे फोटो छापेल. राग भडकवेल. पण करुणामय बौद्ध पत्रकार लिहितो. त्या शेतकऱ्याच्या वहिखात्यावर कर्जाचा बोझा वाढला. आणि पावसाचा अभाव एकत्र आला. तेव्हा त्याच्या डोळ्यातील जगण्याची आशा मावळली. त्याची माती, त्याचे स्वप्न, त्याचे मुलें सर्व काही एका रात्रीत विसरला. मी त्या मातीत बसलो. तेव्हा जाणवले की ही वेदना केवळ त्यांची नाही. ती आपल्या सर्वांची आहे. ही करुणा मला सांगते. फक्त लिहिणे पुरेसे नाही. काहीतरी करणे आवश्यक आहे. यवतमाळच्या कलावतीचे एका राजकारण्यामुळे भाग्य उजाळले. ते कसे उजाळले. ती बातमी आहे. अनेकांना प्रेरणा देणारी आहे. ही शैली भावनिक असते. कारण ती वाचकाच्या हृदयात वेदना निर्माण करते. ती वेदना रागात रूपांतरित होत नाही. ती कृतीत रूपांतरित होते. प्रभावी असते कारण ती पीडितांना आवाज देते. त्यांच्या मानवी गरिमेचा आदर करते. परिणामकारक असते कारण अशा बातम्या, लेख वाचून लोक मदतीचे हात पुढे करतात. धोरणे बदलण्याची मागणी करतात. करुणा ही ती नदी आहे. जी दुःखाच्या पर्वतातून वाहते. पण तिचे पाणी कधीही विषारी होत नाही. ते फक्त शुद्ध आणि जीवनदायी असते. बौद्ध विचारवंतांच्या मते करुणा ही लवचिकतेची गुरुकिल्ली आहे. जेव्हा बौद्ध पत्रकार करुणेने लिहितो. तेव्हा तो पीडिताला शोषित करत नाही. तर त्याला सशक्त करतो. तो सनसनाटी पसरेल असे छायातित्र टाळतो. कारण करुणा सांगते. दुसऱ्याच्या जखमेवर मीठ चोळू नका, मलम लावा.




प्रज्ञा ही बौद्ध तत्वज्ञानातील सर्वोच्च बुद्धिमत्ता आहे. केवळ बौद्धिक ज्ञान नाही.जी सत्या-मिथ्येचे, कारण-परिणामाचे आणि अनित्यतेचे स्पष्ट दर्शन देते. ती करुणेशी जोडलेली असते, कारण प्रज्ञा शिवाय करुणा अंधळी होते. करुणेशिवाय प्रज्ञा कठोर होते. बौद्ध पत्रकार प्रज्ञेने लिहितो. तो बातमीच्या पृष्ठभागावर थांबत नाही. तर मुळपर्यंत खोलवर जातो. एखाद्या सामाजिक अत्याचाराच्या घटनेत तो फक्त 'काय झाले' सांगत नाही, तर 'का झाले' शोधतो. जातीय पूर्वग्रह, आर्थिक असमानता, राजकीय फायदे, सामूहिक अज्ञान. त्याची प्रज्ञा सांगते हा अत्याचार केवळ एक घटना नाही, तो हजारो वर्षांच्या अंधाराचा परिणाम आहे. तो अंधार कायमचा नाही. प्रज्ञेच्या दिव्याने तो दूर होऊ शकतो. तो प्रभावी शैलीत लिहितो. 'प्रज्ञा ही तलवार आहे. जी द्वेषाचे जाळे कापते. ती तलवार करुणेच्या म्यानात राहते. ती कापते, पण जखमा भरते.' उदाहरणार्थ, पर्यावरणीय संकटाच्या वृत्तामध्ये तो केवळ वृक्ष तोडणे दाखवत नाही. तर त्यामागील लोभ, अज्ञान आणि भविष्यातील दुःख दाखवतो. तो आकडेवारी देतो. त्यासोबत मानवी कहाणी विणतो. तो आदिवासी ज्याने वन देवाला मानले. आज त्याच वनात तो बेघर झाला आहे. प्रज्ञा सांगते. हा त्याचा एकट्याचा प्रश्न नाही. हा पृथ्वीतळावरील संपूर्ण कुटुंबांचा प्रश्न आहे. ही प्रज्ञा परिणामकारक असते. कारण ती दीर्घकालीन विश्लेषण देते. यातून वाचकाला फक्त राग येत नाही. तो कारण समजतो. बदलासाठी तयार होतो. भावनिक आणि साहित्यिक रूपात प्रज्ञेचा प्रकाश जेव्हा पडतो. तेव्हा दुःखाचे काळे ढग दूर होतात. मग दिसते प्रत्येक जखमेतून फुल उमलण्याची शक्यता असते. बौद्ध पत्रकार तो प्रकाश पसरवतो. ज्यामुळे वाचक स्वतःला विचारतो. 'मीही प्रज्ञेचा दिवा बनू शकतो का?' समता ही मनाची समभाव अवस्था आहे.

**बौद्ध पत्रकारिता-३**



भूपेंद्र गणवीर
मो. 9850031019

आनंद आणि दुःख, यश आणि अपयश, मित्र आणि शत्रू यांना समान डोळ्याने पाहणे. ती उदासीनता नाही, तर गहन काळजीसहितची स्थिरता आहे. जसे आई आपल्या मोठ्या मुलाच्या व्यवसायातील यश-अपयश पाहते. काळजी करते.पण भावनिक गुंतागुंत टाळते. बौद्ध पत्रकार समतेने लिहितो. तो एका पक्षाला सज्जन आणि दुसऱ्या पक्षाला दुष्ट बनवत नाही. तो दोन्ही बाजूंच्या दुःखाला समान करुणेने पाहतो. दंगलीच्या वृतांकनात तो हिंसकांना दोष देतो. पण त्यांच्या अज्ञानालाही करुणेने पाहतो. द्वेषाने भरलेले मन हे स्वतःचे दुःख आहे. असे तो शांत भाषेत लिहितो. समता त्याला रागीट शिर्षकापासून वाचवते. सत्याच्या मध्य मार्गावर ठेवते. ही समता प्रभावी असते कारण ती विश्वास निर्माण करते. लोक जाणतात की हा पत्रकार निष्पक्ष आहे. फक्त सत्य सांगतो. ती पत्रकारिता परिणामकारक असते. ती द्वेष वाढवत नाही. तर संवाद आणि समन्वयाला प्रोत्साहन देते. समता ही ती शांत सरोवर आहे. ज्यात आकाश प्रतिबिंबित होते. वादळ येते.पाणी खळबळते. पण तळाशी शांतता कायम असते. बौद्ध पत्रकार त्या शांततेत बसतो आणि लिहितो. ज्यामुळे वाचकाच्या मनातही शांतता रुजते. 'उदाहरणार्थ, राजकीय भ्रष्टाचाराच्या बातमीत समता सांगते. नेता भ्रष्ट आहे.पण तोही तृष्णेच्या जाळ्यात अडकला आहे. त्याचे दुःख वेगळे आहे. प्रज्ञा त्याचे मूळ दाखवते.करुणा त्याला मुक्तीची आशा देते. समता निष्पक्ष ठेवते. यामुळे वृत्त रागजनक न राहता, विचारप्रवर्तक होतो. या तीन गुणांचा संगम बौद्ध पत्रकारितेला अद्वितीय बनवतो. करुणे शिवाय प्रज्ञा कठोर होते. प्रज्ञा शिवाय करुणा भावुक होते. समते शिवाय दोन्ही अतिरेकी होतात. एकत्रितपणे ते सजग पत्रकारितेचे आधारस्तंभ बनतात. कल्पना करा. एखाद्या महिला अत्याचाराच्या प्रकरणात. करुणा पीडितेच्या वेदनेला स्पर्श करते. तिची कहाणी करुणामय भाषेत सांगते.

प्रज्ञा सामाजिक कारणे. कायद्याचे अपयश आणि सुधारणेचे मार्ग दाखवते. समता दोन्ही बाजूंना समान डोळ्याने पाहते. पीडितेला न्याय आणि आरोपीला देखील मानवी गरिमा शिकविते. असे वृत्त प्रभावी, परिणामकारक, भावनिक असतात. त्या रात्रीच्या अंधारात एका मुलीची चीख गूंजली. करुणा त्या चीखेला ऐकते. प्रज्ञा त्या अंधाराचे मूळ शोधते आणि समता सांगते. हा अंधार संपेल. कारण प्रत्येक अंधारात प्रज्ञेचा उगवता सूर्य लपलेला असतो. भारतीय संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनात प्रज्ञा, करुणा आणि समता दिसते. त्यांनी दलितांच्या दुःखाला करुणेने पाहिले, प्रज्ञेने जातिव्यवस्थेचे विश्लेषण केले आणि समतेने नवीन मार्ग (बौद्ध धर्म) सुचवला. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियावर द्वेष पसरवणाऱ्या पोस्ट्सच्या विरोधात बौद्ध पत्रकारिता ही त्रिसूत्री घेऊन येते. ती लाइक्ससाठी नाही. मुक्तीसाठी लिहिते. बौद्ध पत्रकार करुणा, प्रज्ञा आणि समता आत्मसात करतो. तेव्हा त्याचे लेख केवळ बातम्या राहत नाहीत. ते कथा बनतात. कविता बनतात. प्रेरणा बनतात. भाषा चित्रात्मक असते. दुःखाचे काळे ढग जेव्हा आकाश व्यापतात. तेव्हा करुणेची हलकी पावसाची सर येते. प्रज्ञेचा विजेचा कडकडाट होते. समतेचा इंद्रधनुष्य उमलतो. ही पत्रकारिता परिणामकारक असते. कारण ती समाजात शांती रुजवते. द्वेष कमी करते. न्यायाची मागणी करते. भावनिक असते. कारण ती वाचकाला 'बोधिसत्त्व' बनवते. दुसऱ्याच्या दुःखासाठी जागृत होणारा. प्रभावी असते कारण ती दीर्घकाळ टिकणारा विश्वास निर्माण करते. आज जेव्हा मीडिया विश्वास गमावतोय, तेव्हा करुणा, प्रज्ञा आणि समता यांचा अवलंब करणारी पत्रकारिता नवीन आशा आहे. प्रत्येक पत्रकाराने स्वतःला विचारावे. माझ्या शब्दांत करुणा आहे का? प्रज्ञा आहे का? समता आहे का?'जर पत्रकारिता या तीन गुणांवर उभी राहिली, तर ती केवळ चौथा स्तंभ राहणार नाही. तर ती धर्मचक्र बनेल. जे दुःखमुक्तीचा संदेश घेऊन फिरेल. बुद्धांच्या शिकवणीत जसे करुणा, प्रज्ञा आणि समता एकत्र येतात. तसेच बौद्ध पत्रकारिता समाजाला प्रकाशित करेल. शांत करेल आणि मुक्त करेल.करुणा ही फूल आहे. प्रज्ञा त्याची मुळे आहेत. समता त्याचे पाणी आहे. एकत्रितपणे ते अमर्याद सौंदर्य निर्माण करतात. जसे बुद्धांच्या हास्यातील करूणामय शांती...!

> **बातमी**
>
> **उन्हाळ्याचा वाढता कहर दुर्बलांचे जीवन होरपळले..!**
>
> नागपूर दि.3 - उष्णतेच्या लाटांनी जनजीवन विस्कळित झाले. मानवी वेदनांचा आक्रोश वाढला. रस्त्यावर काम करणारे मजूर, बांधकाम कामगार, फेरीवाले, झोपडपट्टीत राहणारे कुटुंब. यांच्यासाठी हा उन्हाळा जगण्याची झुंज ठरला. पाण्याची टंचाई, विजेचे अपुरे वितरण आणि आरोग्य सुविधांचा अभाव यामुळे त्यांच्या संकटात आणखी भर पडत आहे. भगवान गौतम बुद्धांनी सांगितले होते.
> सब्बे सत्ताः सुखी होन्तु, सब्बे सत्ताः निरामया (सर्व प्राणी सुखी होवोत, सर्व प्राणी रोगमुक्त राहोत) परंतु आजची वस्तुस्थिती या तत्त्वांच्या विरुद्ध आहे. तापमानाच्या वाढीचा सर्वाधिक फटका हा गरिब, वंचित आणि उपेक्षित समाजाला बसतो. ही विषमता सामाजिक, पर्यावरणीय व अन्यायाचाही एक गंभीर चेहरा आहे. प्रज्ञेच्या प्रकाशात या संकटाचे विश्लेषण केले असता स्पष्ट होते की, अनियंत्रित शहरीकरण, वृक्षतोड, औद्योगिक प्रदूषण आणि कार्बन उत्सर्जन हे या परिस्थितीची मुख्य कारणे आहेत. हवामान बदल हा केवळ वैज्ञानिक विषय नाही. तो नैतिक जबाबदारीचाही प्रश्न आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा केलेला अतिरेक आज मानवजातीवर उलटत आहे. समतेच्या तत्त्वानुसार प्रत्येक नागरिकाला सुरक्षित वातावरण, शुद्ध पाणी आणि आरोग्यदायी जीवनाचा अधिकार आहे. मात्र वास्तवात हा अधिकार समानपणे मिळत नाही. वातानुकूलित घरांमध्ये राहणारे आणि थंड पाण्याच्या सुविधा मिळवणारा एक समाज आहे. दुसरीकडे उन्हात तळपणाऱ्या झोपड्यांमध्ये जगणारा समाज आहे. ही दरी अधिकच खोल होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. शहरांमध्ये 'कूलिंग सेंटर्स' उभारावे. मोफत पाणी वितरण करावे. आरोग्य तपासणी शिबिरे उघडावी. कामगारांसाठी विश्रांतीची सुविधा उपलब्ध करून द्यावी. त्याचबरोबर दीर्घकालीन उपाय म्हणून वृक्षारोपण, जलसंधारण आणि शाश्वत विकास धोरणांची अंमलबजावणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

बौद्ध पत्रकारिता केवळ बातमी देत नाही, तर समाजाला जागृत करते. करुणा आपल्याला इतरांच्या वेदना जाणवून देते. प्रज्ञा त्या वेदनांचे मूळ शोधते. समता त्या वेदनांवर न्याय्य उपाय सुचवते. या उष्णतेच्या लाट आपल्याला एक संदेश देत आहे. जर आपण निसर्गाशी समतोल साधला नाही.तर हा तापमानाचा वाढता पारा मानवी अस्तित्वालाच प्रश्न विचारणारा संकट बनेल. ही वेळ आहे. करुणेने विचार करण्याची, प्रज्ञेने निर्णय घेण्याची आणि समतेने कृती करण्याची. ■■

# होर्मूज सामुद्रधुनी

## जागतिक अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा समुद्री मार्ग

होर्मूज सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाची जलवाहतूक मार्गांपैकी एक मानली जाते. पर्शियन आखात आणि ओमानचा आखात यांना जोडणारी ही सामुद्रधुनी जागतिक तेल पुरवठ्याचा मुख्य मार्ग आहे.




जगातील सुमारे 20 टक्के कच्चे तेल या मार्गाने वाहतूक केले जाते, त्यामुळे या प्रदेशाला आंतरराष्ट्रीय पातळीवर अत्यंत धोरणात्मक महत्त्व प्राप्त झाले आहे. 'होर्मूज' हे नाव प्राचीन काळातील होर्मूज बेटावरून पडले असून, हा परिसर पूर्वीपासून व्यापारासाठी प्रसिद्ध होता. भौगोलिक दृष्ट्या पाहता, या सामुद्रधुनीच्या उत्तरेला इराण तर दक्षिणेला ओमान आणि संयुक्त अरब अमिरात (UAE) हे देश आहेत. या स्थानामुळे इराणला या भागात लष्करी आणि रणनीतिक फायदा मिळतो. इराणकडे मजबूत नौदल तसेच काही महत्त्वाची बेटे असल्याने तो या मार्गावर प्रभाव टाकू शकतो. तथापि, ही सामुद्रधुनी आंतरराष्ट्रीय समुद्री मार्ग असल्यामुळे तिच्यावर कोणत्याही एकाच देशाचे पूर्ण नियंत्रण नाही. आंतरराष्ट्रीय कायद्यांनुसार सर्व देशांना येथे मुक्तपणे जहाजे चालवण्याचा अधिकार आहे. त्यामुळे इराण प्रभाव टाकू शकतो, पण पूर्ण नियंत्रण त्याच्याकडे नाही. या मार्गाने जाणारे तेल भारत, चीन, जपान, दक्षिण कोरिया आणि युरोपमधील अनेक देश वापरतात. विशेषतः आशियातील देश या तेलावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. त्यामुळे होर्मूज सामुद्रधुनीत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर आणि तेलाच्या किमतींवर होतो. या सामुद्रधुनीची लांबी सुमारे 160 किलोमीटर असून रुंदी 35 ते 95 किलोमीटरपर्यंत आहे. सर्वात अरुंद भाग सुमारे 33 किलोमीटर इतका आहे. जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी येथे दोन स्वतंत्र मार्ग ठेवण्यात आले आहेत. एक येणाऱ्या जहाजांसाठी आणि दुसरा जाणाऱ्या जहाजांसाठी. प्रत्येक मार्ग सुमारे 3 किलोमीटर रुंद असून मध्ये सुरक्षित अंतर राखण्यासाठी बफर झोन ठेवलेला आहे. या भागात पाण्याची खोली साधारण 60 ते 100 मीटर असल्यामुळे मोठ्या तेलवाहू जहाजांना सहजपणे मार्गक्रमण करता येते. कच्च्या तेलाच्या वाहतुकीवर कोणताही देश थेट शुल्क आकारत नाही, कारण हा मार्ग आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा आहे. मात्र जहाजांना विमा, सुरक्षा व्यवस्था आणि बंदर शुल्क यासाठी खर्च करावा लागतो. जागतिक बाजारपेठेनुसार तेलाच्या किमती ठरवल्या जातात. त्यामुळे या सामुद्रधुनीचे महत्त्व केवळ भौगोलिक नसून आर्थिक आणि राजकीय दृष्ट्याही अत्यंत मोठे आहे. एकूणच, होर्मूज सामुद्रधुनी ही जगाच्या ऊर्जा पुरवठ्याची जीवनवाहिनी मानली जाते. या मार्गावर कोणतीही अडथळा निर्माण झाल्यास त्याचा परिणाम संपूर्ण जगावर होऊ शकतो. त्यामुळेच या प्रदेशाकडे जगातील सर्व प्रमुख देशांचे लक्ष लागून असते आणि त्याचे सामरिक महत्त्व दिवसेंदिवस अधिक वाढत आहे. कच्चे तेल (crude oil) राष्ट्रांना 'मिळते' ते काही एका मार्गाने नाही, तर विविध पद्धतींच्या संयोगातून. थोडक्यात सांगायचे तर उत्पादन, आयात, करार आणि वाहतूक या चार गोष्टी यामागे काम करतात. सर्वप्रथम, काही देश स्वतःच तेल उत्पादन करतात. उदाहरणार्थ Saudi Arabia, Iran, United States यांसारखे देश त्यांच्या भूभागात असलेल्या तेलसाठ्यांमधून तेल काढतात. हे तेल जमिनीखालील किंवा समुद्रातील साठ्यांतून ड्रिलिंगद्वारे (drilling) बाहेर काढले जाते. दुसरी महत्त्वाची पद्धत म्हणजे आयात (import). भारतासारखे देश, जिथे गरजेपेक्षा उत्पादन कमी आहे, ते इतर देशांकडून तेल खरेदी करतात. India आपले बहुतांश कच्चे तेल Iraq, Saudi Arabia, United Arab Emirates यांच्याकडून आयात करतो. हे तेल खरेदी करण्यासाठी देश दीर्घकालीन करार (long-term contracts) करतात. काही वेळा जागतिक बाजारातून (spot market) देखील तेल विकत घेतले जाते. तेलाचे दर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ठरतात, जसे की OPEC (Organization of Petroleum E&porting Countries) यांचा त्यावर मोठा प्रभाव असतो. तेल वाहतुकीसाठी मुख्यतः समुद्री मार्ग वापरले जातात. मोठमोठी तेलवाहू जहाजे (oil tankers) पर्शियन आखातातून निघून Strait of Hormuz मार्गे जगभर पोहोचतात. काही देश पाइपलाइनद्वारे (pipelines) देखील तेल आणतात, पण आंतरराष्ट्रीय व्यापारात जहाजे सर्वाधिक वापरली जातात. शेवटी, देशांमध्ये तेल शुद्धीकरण (refining) करून पेट्रोल, डिझेल, गॅस इत्यादी तयार केले जातात. अशा प्रकारे कच्चे तेल उत्पादन, खरेदी, वाहतूक आणि प्रक्रिया या टप्प्यांतून विविध राष्ट्रांना मिळते आणि त्यावर संपूर्ण अर्थव्यवस्था अवलंबून असते. ■■

डॉ. केशव पाटील
मो.9890171364

# देशातील वातावरण विषारी होत चालले
# सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी

देशात लोकसंख्येच्या निम्मे समाज गरिबी रेषेखाली आहे. त्याला राष्ट्रीय प्रवाहात आणण्याची सरकारची जबाबदारी आहे. त्यासाठी संविधानात आरक्षणाची सोय आहे. ती सोय बंद करण्यासाठी सरकारने सरकारी प्रकल्प बंद करण्याची मोहीम राबवली. खाजगी उद्योगाला आरक्षण लागू नाही. शिक्षणाला जेमतेम दर्जा दिला. शेतीप्रधान देशात शेतीमालाला भाव नाही. महागाई चरम सिमेला पोहोचली. सरकारी आकड्यानुसार 80 कोटी गरिबी रेषेखाली असणाऱ्यांना निवास, प्रतिमहा 5 किलो राशन, गॅस, जीवनावश्यक वस्तू सरकार पुरवतो. यावरून देशात गरिबी रेषेखाली 80 कोटी लोकसंख्या आहे हे सरकारने जाहीर केले. आहे तरीही आधीपेक्षा तीन पट परदेशी कर्ज घेऊन भारत देश जगाचा विश्वगुरु तसेच जगात प्रथम क्रमांकाचा आर्थिक संपन्न देश व्हायला निघाले. केवढा हा विनोद? लाडकी बहीणीला निवडणूकीची खैरात मिळाली. जनता स्वयं निर्भरतेसाठी हाताला काम मागते. सरकार जनतेला स्वयंनिर्भर करीत नाही. याचक करते. सामान्य जनतेची आवक तुटपुंजी जिएसटी, करवृद्धी अधिक. संविधानावर हमले सुरु झाले. देशाच्या राजधानीत भर चौकात संविधानाचे दहन झाले. चौकशी विभागाचा दुरुपयोग व्हायला लागला. धर्मांधता वाढली. महिलांवर, वंचितावर अत्याचार वाढले. अज, अजा मागासांना अत्याचाराची, गुलामीची जाणीव करून देण्यासाठी मनुवादी सरकारने सरकारी प्रकल्प खाजगीकरणात टाकले. संविधानाने माणूसपण मिळालेला जवळपास 16टक्के भारतीय समाज जागा झाला. संविधानावर आघात म्हणजे अंतर्गत युद्धाचे संकेत वाटायला लागले. निवडणुकीत मतांची चोरी, पैशाचा मुक्त व्यापार झाला. प्रश्न विचारणाऱ्यावर देशद्रोहाचा ठपका लागला. हिंदू-मुस्लिम वाद पेटला. बेभरवशाचे शिक्षण झाले. चीनची लोकसंख्या भारतापेक्षा अधिक असताना संगणकासाठी चीनला कर्मचारी वाढवावे लागले.



भारतात नियोजनाअभावी कर्मचारी कमी झाले. एक एक अधिकारी-कर्मचारी 4-5 टेबलाचा भार सांभाळयला लागले. काम प्रपत्रावर आले. 'खाऊंगा नहीं खाने दूंगा नही' प्रधानमंत्र्यांनी प्रतिज्ञा केली. त्या पाठीमागे शिपायापासून मंत्रालयापर्यंत भ्रष्टाचाराची ईडी, सीबीआयची प्रकरणे वाढली. नापिकीने कर्ज परत न केल्यास बँक शेतकऱ्यावर जप्ती लागते. प्रधानमंत्र्यांनी देशोदेशीच्या भेटीने तीनपट कर्ज मिळवला. वीजय माल्ल्या, निरव मोदी मेहूल चौक्शी अशा 15 कर्ज बुडव्यांना 6.66 लाख कोटी कर्ज सरकारने माफ केले. तरी बाकी लाखो कोटी आहे. सरकारी इतमामात ते परदेशात मस्त आहेत. बुद्धाच्या सनातनाला भक्कम पुरावा आहे. हिंदूधर्माचा कोणी संस्थापक नाही. सनातन शब्द हिंदू धर्माला लागू होत नाही. तरी जीभ टाळूला लाऊन जगातील सर्व धर्म, सांप्रदाय हिंदूच्या शाखा असल्याचे सांगून भ्रम पसरविला जातो. 'हम करे वो कायदा' हे संकेत हुकूमशाही कडे इशारा करतात. या तत्वाने देशात संविधान विरोधी वातावरण वाढायला लागले. यावर अखेर सर्वोच्च न्यायालयाची प्रतिक्रिया आली. देशात कशाचा कशातही ताळमेळ नाही. देशात अंतर्गत बेबंदशाही पाय पसरत आहे. 'मरत नाही म्हणून जीवंत' असण्याला जगणे म्हणणे याहून मोठे दुषण नाही. त्यामुळे अघोषित आणीबाणी सुरु असल्याची तक्रार वारंवार होते. पक्ष पक्षाची सत्ता, बदलते. चक्रवर्ती सम्राट अशोकाचे एकछत्री बलाढ्य मौर्य साम्राज्याचा अंत कपटाने पुष्पमित्र-शुंग ब्राम्हणाने केला. मुस्लिम, इंग्रज आले गेले. काँग्रेसची सत्ता गेली. भाजपाची सरकार आहे. परिवर्तन निसर्ग नियम आहे. पश्चातही वारसांचा आदर मिळेल असे घोरांचे सत्गून उरावे. गर्वाचे घर नेहमी रिकामे होतात. देशात सूडयुद्ध सुरु झाले अशी जनतेला भीती वाटायला लागली. अशा परिस्थितीवर सर्वोच्च न्यायालयाची टिपणी सावधानतेचा इशारा समजावा. 'समझदारको इशारा काफी है।' ■■

**विद्या व्यासंग**



प्राचार्य भाऊ वासनिक
मो. 9423606064

# Anaemia (रक्तालपता) पांडुरोग

ॲनिमिया म्हणजे रक्तामध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे. हिमोग्लोबिन हे लाल रक्तपेशी मध्ये असते आणि शरीरातील प्रत्येक अवयवांमध्ये ऑक्सिजन पोहोचवण्याचे काम करते म्हणून जेव्हा शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होते तेव्हा शरीराला पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही आणि त्यामुळे सतत थकवा व अशक्तपणा जाणवू लागतो नॉर्मल हिमोग्लोबिन चे प्रमाण स्त्रियांमध्ये 11.5 ते. 13.5 gm असते तसेच पुरुषांमध्ये 12.5 ते 14.5 gm असते. भारतामध्ये 50टक्के स्त्रियांमध्ये ॲनिमिया दिसून येतो. यामागचे प्रमुख कारण म्हणजे स्त्रिया या स्वतःच्या प्रकृतीकडे तसेच खाण्यापिण्याकडे नेहमीच दुर्लक्ष करतात. भारतामध्ये जवळपास 50 ते 60टक्के स्त्रियांमध्ये हिमोग्लोबिन चे प्रमाण हे 10टक्के च्या आत असते. आणि यामागचे प्रमुख कारण मासिक पाळीच्या वेळी अति रक्त स्त्राव होणे. गर्भावस्था आणि प्रसुतीनंतर स्वतःच्या प्रकृतीकडे केलेले दुर्लक्ष होय. तसेच ग्रामीण भागामध्ये व खेडेगावमधे मासिक पाळी संबंधी असलेले गैरसमज होय. मुलीला किंवा स्त्रीला पाळी मध्ये जास्त रक्तस्त्राव होतो त्यावेळी असा गैरसमज आहे की पाळीमध्ये जास्त रक्तस्त्राव होणे म्हणजे अशुद्ध रक्त बाहेर जाणे. यालाच गावखेड्यामध्ये विटाळाचे रक्त असे म्हणतात. ते अशुद्ध रक्त शरीराबाहेर पडणे हे चांगले आहे असे बरेचदा समजले जाते. आणि त्यामुळे शरीर शुद्ध होते असा गैरसमज आहे. हे गैरसमज ग्रामीण भागामध्ये जास्ती प्रमाणात आहे. त्यामुळे अतिरक्तस्त्राव होऊन ग्रामीण भागामध्ये मुलींमध्ये व स्त्रियांमध्ये ॲनिमिया जास्त प्रमाणात दिसून येतो.



**ॲनिमिया होण्याची कारणे**

1) **Iron deficiency :** आयरन डेफिन्सी म्हणजे शरीरात लोहाची कमतरता होणे. हे ॲनिमियाचे प्रमुख कारण आहे. 2) विटामिन बी12 व फॉलिक ॲसिड याची कमतरता झाल्यामुळे. 3)अनुवंशिक कारण यामध्ये सिकलसेल ॲनिमिया आणि थैलेसमिया, रक्ताचा कर्करोग हे प्रकार बघायला मिळतात. 4) **अतिरक्तस्त्राव :** अपघात, शस्त्रक्रिया तसेच शरीरात कुठल्याही भागात रक्तस्त्राव होत असेल जसे की पाइल्स, फिशर्स, आतड्यांमध्ये होणारा रक्तस्त्राव यामुळे सुद्धा ॲनिमिया होतो. 5)गर्भावस्था आणि प्रसूती. 'ॲनिमिया ची लक्षणे' थकल्यासारखे वाटणे, अशक्तपणा त्वचा व चेहरा निस्तेज दिसणे. ओठ पांढरे दिसणे, चक्कर येणे, डोकेदुखी, श्वास घेण्यास त्रास होणे, थोडेही शारीरिक श्रम केल्यास किंवा जिना चढताना किंवा उतरताना खूप दम लागणे, हृदयाचे ठोके जास्त होणे, छातीत धडधड होणे, माती खडू, लेखणी यासारखे पदार्थ खाण्याची इच्छा होणे.

**Types Of Anemia (ॲनिमिया चे प्रकार ):**

1) **iron defficiency anemia :** शरीरामध्ये लोहाचे प्रमाण कमी झाल्यामुळे होतो.

2) **Megaloblastic Anemia :** विटामिन B12 आणि फॉलिक ॲसिड यांच्या कमतरतेमुळे ॲनिमिया होतो.

3) **sickle cell anemia :** यामध्ये लाल रक्तपेशी चा आकार बदलतो तो हातोड्याप्रमाणे किंवा अर्धचंद्र कोर याप्रमाणे होतो. त्यामुळे लाल रक्तपेशी( red blood cell) चे प्रमाण कमी होते. हा एक अनुवंशिक आजार आहे. 4) **Aplastic Anemia :** यामध्ये अस्थिमजे (bone marrow) मध्ये रक्तपेशी चे उत्पादन कमी प्रमाणात होते. 5) **Hemolytic Anemia :** (हिमोलायटिक ॲनिमिया) : यामध्ये RBC या पेशी वेळेअगोदरच नष्ट होतात. सामान्यत RBC चे life span हे 120 दिवस असते.

**ॲनिमियाचे निदान :**

ॲनिमिया चे निदान करण्यासाठी खालील रक्त तपासण्या केल्या जातात

- हिमोग्लोबिन परसेंट
- CBC ( complite blood cound)
- फेरीटीन लेव्हल ,
- विटामिन B12, व फॉलिक ॲसिड चे प्रमाण चेक करणे.

**उपचार :** यामध्ये ॲनिमियाचा कुठला प्रकार आहे त्यानुसार उपचार केले जातात. 'प्रामुख्याने आयरन सप्लीमेंट्स यामध्ये टेबलेट्स, कॅप्सूल किंवा सिरप फॉर्ममध्ये दिले जातात.'
आहारामध्ये प्रामुख्याने हिरवे पालेभाज्या जसे की पालक, मेथी, गाजर, बीट तसेच अंडी, मासे, चिकन यांचा समावेश करणे आवश्यक आहे. विटामिन B12, मल्टी विटामिन आणि फॉलिक ॲसिड यांचे सप्लीमेंट्स दिले जातात. 'आवश्यकता असल्यास इंजेक्शन लावले जातात. Severe ॲनिमिया यामध्ये (blood transfusion) म्हणजेच रक्त दिले जाते.
'संतुलित व पोषक आहार, आहारामध्ये हिरव्या पालेभाज्या, कडधान्य याचे नियमित सेवन.'
नियमित हिमोग्लोबिन ची तपासणी
'योग्य आहार, स्वस्थ जीवनशैली व वेळेवर डॉक्टरांचा सल्ला यामुळे ॲनिमिया हा आजार पूर्ण बरा होतो'. तसेच sickle cell anemia व thalesemia या आजारावर नियमित औषधोपचार करून हा आजार आपण नियंत्रण ठेवू शकतो . स्वस्थ रहा मस्त रहा. ■■

**आरोग्यम् सुखसंपदा**



डॉ. सूर्यकांता पाटील
मो. 9923338047

“ तुमचे काम तुमची ओळख बनते.
म्हणून कामातून उत्कृष्टता दाखवा... ”



# जनगणना 2027
# बौद्धांनी सावध राहावे, भ्रमित होऊ नये...

महाराष्ट्रात जातीय जनगणनेला लवकरच सुरुवात होणार आहे. या विषयावर बऱ्याच गणमान्य व्यक्ती ज्यामध्ये निवृत्त न्यायाधीश, सनदी अधिकारी, प्रशासनिक अधिकारी, प्राध्यापक, वृत्तपत्र सम्पादक, लेखक ई. यांनी प्रबोधन केले आहे व करीत आहेत. या विषयावर सेमीनार, चर्चासत्र पण होत आहेत. समाजाचे व्यापक हित व संघर्ष करून मिळविलेले अधिकार, आरक्षण, विकास मूलक सुविधा अबाधित ठेवण्यासाठी सामूहिक रुपाने मार्गदर्शन करीत आहेत की खालील प्रमाणे नोंदणी करावी:

**संवर्ग :** अनुसूचित जाती, जाती : महार, धर्म बौद्ध

मी या विषयावर गेल्या दोन वर्षापासून सामाजिक बांधीलकिच्या दैनिकात व सोशल मिडिया वर बरेच अनुपुरक लिखाण केले आहे. काही तथाकथित बुद्धिजीवी बौद्धांना आरक्षण सुविधेपासून वंचित करण्यासाठी किंवा आरक्षण संपुष्टात आणण्यासाठी भ्रामक दुष्प्रचार करीत आहेत की महार जातीची नोंदणी करू नये. अनुसूचित जातीचे आरक्षण व सुविधा जाती आधारित आहेत त्यामुळे सूचीबद्ध जाती जसे महार, मातंग, वाल्मिकी, रविदासी याचा नियमा प्रमाणे उल्लेख करने अत्यावश्यक आहे. आधी अनुसूचित जातीचे आरक्षण हे हिंदू व सिख धर्मिया साठीच लागू होते परंतु आता हे आरक्षण बौद्ध धर्माला पण लागू आहे (काही दिवसापूर्वी सुप्रीम कोर्टाने स्पष्ट निर्णय दिला आहे). त्यामुळे आता आम्ही कोणत्याही प्रकारचा संकोच न ठेवता किंवा अपप्रचाराला बळी न पड़ता जातीचा उल्लेख महार, मातंग, चभांर, वाल्मिकी ई. व धर्म बौद्ध नोंदणी करू शकतो. यामुळे अनुसूचित जाती मधे नोंदणी होईलच सोबत बौद्ध म्हणूनही ओळख प्रस्थापित होईल.

**संवर्ग :** अनुसूचित जाती, जाती : महार, धर्म : बौद्ध अशी नोंदणी केल्याने खालील लाभ मिळतील.

1. अनुसूचित जातीमधे नोंदणी होईल, संख्या वाढेल. आरक्षण व विकासमूलक सुविधा पूर्ववत्र कायम राहतील. 2. शासनाच्या समाज कल्याणकारी योजनाचा लाभ मिळेल. 3. बौद्ध धर्मीय म्हणून जनगणना होईल. इतर राज्यात जसे यूपी, एमपी, पंजाब, हरियाणा, राजस्थान ई. अनुसूचित जाती समुहाचे व्यापक प्रबोधन केल्यास बौद्धांच्या संख्येत लक्षणीय वाढ होईल. 5-6 कोटीच्या वर बौद्धांची जनसंख्या नोंदणी होऊ शकते. अंतरराष्ट्रीय स्तरावर सुरक्षा मिळेल व शैक्षणीक, आर्थिक, सामाजिक विकासाला चालना मिळेल. 4. अनुसूचित जातीचे आरक्षण, सुविधा सोबतच बौद्ध म्हणून अल्पसंख्याक सुविधा पण मिळतील.

काही तथाकथित बुद्धिजीवी षडयंत्रपूर्वक भ्रमित करणारा अपप्रचार करीत आहेत. त्याचे स्पष्टीकरण व उत्तर खालीलप्रमाणे देत आहो.

1. भ्रम निर्माण करण्यासाठी बोलतात की मोठे आंबेडकरी राजकीय नेते, साहित्यिक जसे दादासाहेब गायकवाड, बैरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे, बी सी कांबळे साहेब, रा सु गवई साहेब यांनी कधी जाती महार व धर्म बौद्ध लिहा म्हणून सांगितले नाही. मला या तथाकथित भ्रमित बुद्धिवंताना विचारायाचे आहे की या मान्यवर नेत्यांनी कधी जाती महार लिहू नये असे कधी सांगितले काय? बौद्धांना अनुसूचित जातीच्या आरक्षण/सवलती लागू नव्हत्या त्यामुळे बरेच समाज बांधव जाती महार व धर्म हिंदू नोंदणी करायचे, परंतु या नेत्यांनी याला कधी विरोध केला नाही. कारण या नेत्यांना आरक्षणाचे महत्व माहित होते आणी जाती आधारित आरक्षण असल्यामुळे अनुसूचित जातीच्या सूचीमधे नोंदणीकृत जातीचा उल्लेख करने अनिवार्य आहे याची पूर्ण जाणिव या नेत्यांना होती. उलट अनुसूचित जातीचे आरक्षण, सवलती हिंदू आणी सिख यांच्याप्रमाणे बौद्धांना ही मिळायाला पाहिजेत या साठी सर्वच नेत्यांनी आंदोलन केलेत, मोर्चे काढलेत. विद्यार्थीदशेत



असतांना मी स्वतः मित्रासोबत मोर्च्यात सहभागी होतो. 1960 नंतर गणमान्य नेत्यांच्या प्रयत्नामुळेच महाराष्ट्रापुरते नवबौद्धांना अनुसूचित जातीचे आरक्षण मिळाले, इथेही जातीचा उल्लेख महार करने आवश्यक आहे. या भ्रमित बुद्धिवंताच्या आठवणी ताज्या करून देतो की 1977 मधे जनता पार्टीचे शासन असतांना बैरिस्टर खोब्रागडे व गवई साहेब यांनी तत्कालीन प्रधानमंत्री श्री मोरारजी देसाई यांची भेट घेऊन अनुसूचित जातीचे आरक्षण व सुविधा बौद्धांना पण देण्यात यावे अशी पुरजोर मागणी केली होती. पुणे कराराचे मुळच आरक्षणात आहे. आरक्षण हे डॉ. बाबासाहेबांमुळेच मिळाले आहे. आज समाजाने जी काही प्रगती केली आहे त्यामधे आरक्षणाची प्रमुख भूमिका आहे हे नाकारता येत नाही. समाजाची एकंदर स्थिती पाहता आरक्षणाची गरज आजही आहे. आरक्षण सुविधेसाठी सिख धर्माचे लोक अनुसूचित जाती (वाल्मिकी, रविदासी ई.) चा व धर्म सिख उल्लेख करतात यामुळे सिख धर्माचा अवमान झालेला नाही. उत्तर पूर्वी राज्यातील आदिवासी समुदाय जनजातीचा व धर्म बौद्ध नोंदणी करतात यामुळे बौद्ध धर्माचा अवमान झालेला नाही.

**2. दुसरा घातक भ्रम :** जनगणनेचा कोणताही वाईट परिणाम शिक्षण व नौकरीतील आरक्षणावर होणार नाही. महाराष्ट्रातील बौद्धामूळे एससीच्या टक्केवारी वर विशेष परिणाम होणार नाही. हे तर अकलेचे तारे तोडणारे आहे. आरक्षण टक्केवारी ही जनसंख्येच्या आधारावर आहे. जनसंख्येच्या अनुपात मधे केंद्रात व राज्यात वेगवेगळी टक्केवारी आहे. पंजाब, हरियाणा सारख्या राज्यात 25टक्के पर्यंत अनुसूचित जातीचे आरक्षण आहे. जनसंख्या ठरविण्याचे माध्यम जनगणनाच आहे. जर टक्केवारीच कमी झाली तर त्याचा विपरीत प्रभाव शिक्षण व नौकरीच्या आरक्षणावर निश्चितच पडेल हे सामान्य बुद्धीच्या व्यक्तीला ही समजते. ‘जनगणनेचा कोणताही वाईट परिणाम आरक्षणावर होणार नाही’ म्हणजे जनगणनेत जात महार दाखवू नका परंतु आरक्षण घेतांना जात महार (कारण आरक्षण जातीच्या आधारावर आहे) दाखवा असाच आशय व अर्थ निघतो की नाही? हा सरासर दुष्टपणा आहे व जाणीवपूर्वक षडयंत्र आहे. यामुळे हे तथाकथित बुद्धिवंत बौद्ध धम्माचा कोणता स्वाभिमान वाढवित आहेत? उपवर्गीकरणाचे वारे वेगाने वाहत आहेत. जर महार जातीची नोंदणी नाही केली तर या जातीला आरक्षण व सुविधा अत्यंत कमी मिळेल, ‘शून्य भोपळा’ ही हाथी येऊ शकतो याची जाणीव पाहिजे. हे तथाकथित विद्वान बुद्धवंत महाराष्ट्रापूरताच विचार करतात जेव्हा की डॉ. बाबासाहेब सम्पूर्ण भारत बौद्धमय करण्याचे धेय बाळगत होते. मागासवर्गीय समाजाचा (विशेष करून उत्तरी राज्यात) कल बौद्ध धम्माकडे वाढत आहे. या राज्यात अनुसूचित जातीची लोकसंख्या व आरक्षण 17टक्के ते 25टक्के आहे आणी ही लोक आरक्षणावर पाणी सोडणार नाहीत हे वास्तव आहे. या राज्यात अनुसूचित जातीच्या ज्या लोकांनी बौद्ध धर्म स्वीकार केला त्यांचे सुनियोजित प्रबोधने केले तर देशात 5 कोटी पेक्षा जास्त बौद्धांची जनसंख्या नोंदणी होऊ शकते या कडे लक्ष्य द्यावे. यासाठी जाती म्हणून अनुसूचित जाती (महार, मातंग वाल्मिकी, रविदासी ई) व धर्म बौद्ध नोंदणी करणे आवश्यक आहे.

3. नौकरीतील आरक्षण कमी झाले आहे हे पूर्ण सत्य नाही आहे. रेल्वे, बँकां इत्यादी मधे बऱ्याच प्रमाणात रिक्रुटमेंट झाले आहे. सहज बैंकेत फेरफटका मारला तरी लक्षात येइल की अधिकांश नवीन पीढी सेवेत आहे व आरक्षण लाभार्थी पण आहेत. स्थाई रिक्रुटमेंट, आरक्षण कमी जरी झाले असले तरी नेहमीच असे राहील हे म्हणता येत नाही, भविष्याविषयी आशावादी पाहिजे. आरक्षण कमी झाले म्हणून टक्केवारी कमी करने किंवा पात्रता गमावने मूर्खपणाचे ठरेल. आरक्षण हे काही भीख नाही आहे तर जनसंख्येच्या प्रमाणात सन्मान पूर्वक योग्य हिस्सा/वाटा मिळविण्याचे प्रभावी माध्यम आहे. तुम्ही कितीही धनवान किंवा हुशार (मेरीटोरीशियस) असले तरी सामान्य (अनरिज़र्व) श्रेणी मधे तुमची जात किंवा जातीवाचक नाव/ ओळख गतिरोध निर्माण करणारच आणी धन नेहमी साठी टिकणार नाही हे वास्तव आहे. म्हणून येणाऱ्या काळात आरक्षणाचे व बौद्ध धम्माचे महत्व समजून घ्यायला पाहिजे. माझी परत एकदा विनंती आहे की पूर्वाश्रमीच्या महार किंवा इतर एससी/ एसटी/ ओबीसी जातीच्या नागरिकांनी ज्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आहे त्यांनी जातीचा उल्लेख महार किंवा तत्सम जातीचा अवश्य उल्लेख करावा व धर्म म्हणून बौद्ध धर्म उल्लेख करावा. ■ ■



लक्ष्मण बोरकर
मो. 7709318607

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

## कुंकवाचा धनी

तिच्या पतीचे निधन झाले. सांत्वनासाठी आलेली एक महिला म्हणाली, ‘एक ना एक दिवस प्रत्येकाला जावेच लागते. त्यांचे वय झाले होते.’ त्यावर ती म्हणाली, ‘पत्नी तोपर्यंत वृद्ध होत नाही, जोपर्यंत तिच्या कुंकवाचा धनी जिवंत असतो आणि पतीसुद्धा तो पर्यंत वृद्ध होत नाही, जोवर त्याची अर्धांगीनी जिवंत असते. पण या पैकी कुणाही एकाचा मृत्यू झाला तर, दुसरी व्यक्ती खऱ्या अर्थाने वृद्ध व्हायला लागते. कारण पाण्याचा स्वाद तोपर्यंतच घ्यावा वाटतो, जोपर्यंत जीव तहानलेला असतो. आपल्या जोडीदाराचे महत्त्व तेव्हा खूप जाणवते जेव्हा तो एकटा असतो. दुःख काय असते हे त्या व्यक्तीला विचारा, ज्याचे मनात बोलण्यासारखे खूप काही असूनही ओठांतून मात्र काहीही बाहेर पडत नाही. कारण त्याला समजून घेणारा जोडीदार निघून गेलेला असतो आणि तोही कायमचा. कारण जोडीदार हा असा आधार असतो, जो जाणीवही होऊ देत नाही आणि उणीवही राहू देत नाही. ■ ■

# बौद्धांची जनगणना...

**जनगणनेत बौद्धांनी आपली नोंद बौद्ध म्हणूनच करावी; जात लिहू नये; असं काही विद्वानांचे मत आहे. माझं ही हेच मत आहे. परंतु ...**





मे 2026 मधील जनगणनेत जात नाही लिहिली तर आरक्षण जाईल; अशी विनाकारण भीती दाखवित आहेत. असे काही विद्वान म्हणतात. खरे म्हणजे आरक्षण आता शिल्लक उरलेच नाही. पण जात लिहिण्यामागे केवळ हेच एक कारण नाही. त्यामागे खूप दूरगामी विचार आहे. पण हे शब्दात सांगणे कठीण आहे. हे दूरगामी कारण सर्वांच्याच लक्षात येत नाही. कारण भावनिक विचारवंत ते लक्षात घेत नाही. ही जनगणना आरक्षणासाठी नाही. हीच काय कोणतीच जनगणना आरक्षणासाठी नसते. पण जनगणनेच्या आकडेवारीचा कुठे, केव्हा, कसा वापर केला जातो; याची जाणीव ठेऊन आम्ही निर्णय घेतला पाहिजे. सांविधानात कितीही कडेकोट कलमे असले तरी; सत्तापिपासू नेते त्याची दखल न घेता त्याच आकड्यांचा वापर किंवा गैरवापर करून धोरण ठरवीत असतात. परंतु....जनगणनेचे काम करीत असलेल्या लोकांकडून नुकतीच एक माहिती पुढे आली आहे. इंटरनेट व मोबाईल मध्ये सुद्धा धर्म बौद्ध आणि जात महार हे दोन्ही ऑप्शन येतंच नसून; धर्म हिंदू आणि जात महार असेच ऑप्शन येते. मग यासाठी आताच काही तरी करायला हवे, प्रत्यक्षात ही अडचण असेल तर वर दिलेल्या सूचनेला काहीच अर्थ उरत नाही. हे सर्वांनाच माहित असण्याची शक्यता नाही. आम्ही कितीही सांगितले तरी त्याचा उपयोग नाही. म्हणून आधी ते ऑप्शन येण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेबांनी सांविधानात कितीही तरतुदी केल्या असल्या तरी आजचे सत्ताधारी त्या नुसारच वागतील अशी अपेक्षा करू नये. म्हणून यामुळे त्यांच्या हाती नवीन कोलीत मिळेल. याच आकडेवारीचा ते त्यांच्या मताने वापर करतील. 1976 ला 42 वी घटना दुरूस्ती करुन त्यानंतर 25 वर्षांनी म्हणजे 2001 च्या जनगणने नुसार बदल केले जातील; असा निर्णय झाला. परंतु ती मुदत वाढवून 2031 करण्यात आली; असा स्पष्ट उल्लेख 330 व 332 (3 ब) मध्ये आहे; म्हणून 2026 च्या जनगणनेचा आरक्षणाशी काही संबंध नाही. असे म्हणणे उथळपणाचे लक्षण आहे. जात न लिहिल्याने आरक्षण समाप्त होईल; असे नाही आणि त्याचा फायदा होईल असेही नाही. पण जात लिहिल्याने कोणतेही नुकसान नाही; ते त्याहून अधीक स्पष्ट आहे. गोलमेज परिषद, इंग्लंडचे तत्कालीन प्रधान मंत्री रॅम्से मॅकडोनाल्ड यांचा 1932 मधला जातीय निवाडा आणि वेळोवेळी झालेल्या घटना दुरूस्त्या विचारात घेऊन आजचे सत्तांध लोक निर्णय घेतात; असे कोणाला वाटत असेल तर त्यांच्या ‘श्रद्धा’ तपासून पाहणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतर मागासवर्गीय, अस्पृश्य आणि आदीवासी यांना ओबीसी, शेड्युल्ड कास्ट व शेड्युल्ड ट्राईब ही ओळख देऊन त्यांना काही सवलती दिल्या. त्यांनी सांविधानातील 303 कलमात 1935 चा गवर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट समाविष्ट केला आहे. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी म्हटले होते की; बौद्ध समाजाच्या सवलती माझ्या कोटाच्या खिशात आहेत. पण तो कोटाचा खिसा आता नाही. कृपया भावनात्मक विचार न करता; सत्ताधाऱ्यांची मानसिकता ही वस्तूस्थिती लक्षात घेऊन निर्णय घ्यावा; अशी विनंती आहे. ■ ■



प्रा. डॉ. भीमराव गोटे
9822235029

**दहा मुलांचे संगोपन करून आंबेडकरी चळवळीला गतिमान करणाऱ्या गोड गळ्याच्या गायिका पुण्यश्लोक सोनाबाई भीमराव साळुंके यांचा आज, 5 मे रोजी 40 वा स्मृतीदिन त्यानिमित्ताने...**

# भीमराव जीवाचा विसावा गं बाई

आंबेडकरी चळवळीत पुरुषांप्रमाणेच ज्या ज्या स्त्रियांनी संसाराचा भार वहन करून प्रसंगी जीवाची पर्वा न करता स्वतःला वाहून घेतले होते, त्यात धुळेच्या पुण्यश्लोक सोनाबाई भीमराव साळुंके यांचेही नाव अतिशय सन्माननीय आहे. सोनाबाईंचा जन्म साधारणतः 1912च्या सुमारास माळेगाव, जि. नाशिक या ठिकाणी गरीब कुटुंबात झाला. माळेगाव निसर्गाच्या सृष्टीसौंदर्याने नटलेले गाव. त्याच गावात चार किलोमीटर अंतरावर अनकई नावाचा किल्ला आहे. तेथे पर्यटक फिरायला येतात. भीमराव साळुंके यांचे चुलते कूराजी साबळे माळेगावात आले असता घरकाम करणारी गौरवर्णीय सोना नावाची मुलगी त्यांना नजरेस पडली. त्यांनी सोनाबाईचे वडील हारकूजी अहिरे यांचेकडे लग्नाची मागणी केली. अशा रीतीने सोनाबाईचे लग्न भीमराव साळुंके यांचेशी झाले. लग्नानंतर सोनाबाईने पती भीमराव साळुंके यांच्याबरोबर स्वतःला आंबेडकरी चळवळीत भक्तिभावाने वाहून घेतले. त्यांच्या घरी स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे नेते, कवी, शाहीर, गायक व कार्यकर्त्यांचा नेहमी जमावडा असे. एकदा क्रांतीसिंह नाना पाटील धुळ्यात आले असता सोनाबाईने त्यांचा आदर-सत्कार करून त्यांना मांड्याच्या पाहुणचार केला होता. कॅप्टन भीमराव वस्ताद हे दादासाहेब गायकवाड, न्या. आर.आर. भोळे, शांताबाई दाणी पी.जे. रोहम, मिंढे पाटील, के.एस. सावंत, पा.ना. राजभोज, मो.वा. दोंदे, अण्णासाहेब लळिंगकर आदिबरोबर खान्देशात धुळे, चाळीसगाव, नाशिक, औरंगाबाद, मनमाड इ. ठिकाणी दौऱ्यावर जात. ते घरी परत येईपर्यंत सोनाबाई त्यांची वाट पहात आपल्या चिल्या-पिल्यांना मायेने पोटाशी धरीत. मुलांचे उत्तम पालनपोषण करून त्यांना सुशिक्षित बनविले. त्यांना शिक्षण देऊन समाजकार्यासाठी व परिवर्तनासाठी प्रयत्नशील व्हायला शिकविले. सोनाबाईचे पती भीमराव साळुंके हे न्यू प्रताप मिल धुळे येथे मिल कामगार म्हणून नोकरीत होते. त्यांचेबरोबर सोनाबाई देखील मिल कामगार म्हणून लागल्या होत्या. त्यावेळी दिवसभर गिरणीत दहा तास काम करून संध्याकाळी थकल्या-भागल्यासारखे वाटून देखील त्या भीमरावांना समाजकार्यात कसलाही अडथळा करीत नसत. उलट भीमराव वस्ताद यांनी स्थापन केलेल्या जयभीम व्यायाम शाळेत जाण्याची सूचना त्यांना वेळोवेळी करीत. सोनाबाई जयभीम व्यायाम शाळा, मिल चाळ या शाखेच्या खजिनदार म्हणून कार्यरत होत्या. घरातील कामे आटोपून स्त्री कर्तव्य सांभाळून त्या स्वतः महिला मंडळात सामील होण्यात, सभा, परिषदेत हजर राहण्यास कधीच टाळत नसत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या उपकाराची फेड, समाजाचे ऋण फेटावे या उदात्त हेतूने त्यांनी पती भीमरावांना समाजसेवेसाठी मोकळे सोडले होते. गोड गळ्याच्या धनी असलेल्या सोनाबाई आपल्या सुश्राव्य गायनातून खेड्यापाड्यात डॉ.बाबासाहेबांच्या विचारांची बाग फूलवून समाजाला जागृत करायच्या. डॉ.बाबासाहेबांचे विचारधन, गाणी, स्तुतीपर कवने, ओव्या, आरती, पाळणा लोकांना फार आवडायचे. त्या आपल्या गाण्यातून डॉ.बाबासाहेबांबद्दल अतीव आदर, प्रेम, आस्था, जिव्हाळा व्यक्त करीत. शेजारच्या सुंदराबाई सोनवणे यांच्यासोबतच सोनाबाई पहाटेला चार वाजता उठून घरघर करणाऱ्या दगडाच्या जात्यावर रसाळ भीमओवी म्हणायच्या. तेव्हा सारा आसमंत भीममय झाल्यासारखा वाटायचा, अशी गोड आठवण सोनाबाईचा मुलगा स्मृतिशेष प्रतापराव भीमराव साळुंके मला नेहमी सांगायचे.

दीन दयाळू दाता भीम दुबळ्यांचा नेता
सीया जनतेचा पालन वाला
ग बाई स्वप्नात माझ्या आला ।।
भीमराव जीवाचा विसावा ग बाई माझा
त्याच नाव घेता शीण भाग जातो
जस काही भीम माझ्या मदतीला येतो
सदा तोची मनी आठवावा ।।

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या दलितांच्या स्वातंत्र्य चळवळीत सोनाबाईने स्वयंस्फूर्तीने भाग घेतला होता. अशिक्षित असून देखील त्या सामाजिक, धार्मिक व





महिला चळवळीत अग्रभागी होत्या. जी.आय.पी. रेल्वे कामगार परिषद 12-13 फेब्रूवारी 1938 (मनमाड), अ.भा. दलित फेडरेशनचे तिसरे अधिवेशन 4, 5 व 6 मे 1945 रोजी मुंबईत नरेपार्कच्या मैदानात भरले होते. त्या ठिकाणीही सोनाबाई आवर्जून उपस्थित होत्या. तसेच धुळे येथे रावेर शिवारात चितोडनजिक 26 जानेवारी 1965 रोजी भूमिहीनांचा सत्याग्रह करण्यात आला. त्या सत्याग्रहात सोनाबाईचा सहभाग होता. 500 सत्याग्रहींना अटक झाली. धुळ्याच्या तुरुंगात जागा नसल्याने चित्रपटगृहे भाड्याने घ्यावी लागली होती. हा रिपब्लिकन पक्षाचा ऐतिहासिक विजय होता.

सोनाबाई साळुंके यांनी पतीच्या सहकार्याने ‘समतावादी दलित मंडळ हौसिंग सोसायटी’ स्थापन करून गोरगरीब, रंजल्या-गांजल्या दलित समाजाला घरकूले उपलब्ध करून देण्याचे महान पुण्यकर्म केले. त्यांचे ऋण आंबेडकरी समाज विसरू शकणार नाही. समाजाला भूषणावह वाटावे अशा या आदर्श साळुंके दाम्पंत्याने आपल्या मिळकतीचा हिस्सा काही प्रमाणात समाजासाठी खर्च केला. आंबेडकरी चळवळीत मोलाचे योगदान दिले. अशा या धीरगंभीर आंबेडकरी चळवळीतल्या अस्सल सोनाबाई साळुंके यांचे 5 मे 1986 रोजी सायंकाळी साडे सहाच्या सुमारास वृद्धापकाळाने धुळे शहरात परिनिर्वाण झाले झाले. त्या देहरूपाने आज हयात नसल्या तरी कीर्तीरूपाने जिवंतच आहेत. त्यांची पतीनिष्ठा, समाजसेवा, कर्तव्यपरायणता आंबेडकरी समाजाला प्रेरणा देत राहील. 40व्या स्मृतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन. ■ ■

# डॉ. बाबासाहेबांच्या रहिमतपूर सभेची अर्थात ‘सातारा जिल्हा महार परिषदेची’ शताब्दी

**आशिया खंडातील पहिली ग्रामपंचायत, मुंबई प्रांतातील दुसरी नगरपालिका म्हणून ज्या रहिमतपूर चा ऊल्येख केला जातो त्या रहिमतपूर तालुका कोरेगाव जिल्हा सातारा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दिनांक 5 मे 1926 रोजी सभा झाली होती.**

16 व्या शतकात आदिलशाहीतील रहिमत खान या सरदाराने हे गाव वसविले आहे. रहिमतपूर हे गाव कुमंडलू नदी किनारी वसले आहे . या नदीच्या एका बाजूस मुस्लिम वस्ती तर दुसऱ्या बाजूस हिंदू वस्ती आहे . या दोन्ही धर्मीय जनतेला जोडण्या करिता या नदीवर केसरी नावाचा पुल बांधण्यात आला. 16 व्या शतकापासूनच हे शहर व्यापारी दृष्ट्या गजबजलेले राहिले आहे. पेशव्यांच्या काळी येथे टाकसाळ होती. इथे अस्पृश्य समाजाची वस्ती आधी पासूनच होती . डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचे लोण अगदी सुरवातीच्या काळापासून इथे पसरले होते. डॉ. बाबासाहेबांनी इथे जिल्हास्तरीय महार परिषद घेण्याचा विचार बोलून दाखविला असता स्थानिक महार लोकांनी या परिषदेचे आयोजन केले, परिषदेच्या यशस्वीतेकरिता महिलांचा सुद्धा सहभाग राहिलेला होता .

सातारा जिल्हा महार परिषद दिनांक 5 मे 1926 रोजी रहिमतपूर येथे घेण्याचे निश्चित झाले असता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अध्यक्ष म्हणून परिषदेस येण्याचे मान्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या गावी येणार म्हणून सर्व अस्पृश्य समाजात तसेच सत्यशोधक, ब्राम्हणेतर चळवळीतील जनतेत मोठा उत्साह संचारला. या काळी इथे ब्राम्हणेतर चळवळ मोठी प्रभावी होती. धनजी भाई हे या चळवळीचे मोठे नेते होते. त्यांनीसुद्धा या परिषदेच्या यशस्वितेसाठी सहकार्य केले. ही परिषद सातारा जिल्ह्यातील महार समाजाची जरी असली तरी या परिषदेस मुंबई, पुणे, फलटण आदी भागांतून महार लोक मोठ्यासंख्येने आलेले होते. सातारा लोकल बोर्डचे अध्यक्ष ( जे पुढे मुंबई प्रांताचे पहिले प्रधानमंत्री झाले ) प्रसिद्ध उद्योगपती तथा नगरसेवक, नगराध्यक्ष अशी पदे भूषविलेले धनजी भाई कूपर, प्रसिद्ध स्वातंत्र्य सेनानी, ( जे पुढे 1947 ते 1952 मुंबई विधान परिषदेचे सभापती झाले.) रामचंद्र सोमण, प्रसिद्ध स्वातंत्र्य सेनानी सीताराम रामजी तावडे, कोरेगाव चे तहसीलदार दुदुस्कर मुख्य अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले.

परिषदेचे स्थळ हे पटांगण होते, सभामंच सुशोभित होता, सभेची वेळ दुपारी 3 ची होती. परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर व निमंत्रित सर्व मंडळी वेळेत सभामंचवर आली. या सभेस सीताराम शिवतरकर, जनार्दन रणपिसे, धर्माजी सावंत व काही मंडळी डॉ. बाबासाहेबांसोबत आली होती. परिषदेस सुमारे 15 हजार लोक उपस्थित असल्याचे सांगितले जाते. या परिषदेत सातारा लोकल बोर्डचे अध्यक्ष धनजीभाई कूपर, सीताराम शिवतरकर, जनार्दन रणपिसे, सीताराम रामजी तावडे, रामचंद्र सोमण यांची मुख्य भाषणे झाल्यानंतर विविध ठरावांचे वाचन करण्यात आले.

यात एक ठराव असा वाचण्यात आला की, ‘बहिष्कृत वर्गातील योग्य व्यक्तीस जे. पी. करावे’. ठरावांचे वाचन होताच रामचंद्र सोमण यांनी या ठरावास हरकत घेतली. हरकत घेतांना सोमण यांनी सांगितले की, आपल्या देशावर परकियांची सत्ता आहे, त्या सत्तेविरूद्ध देशात मोठे आंदोलन सुरू आहे अश्या परिस्थितीत आपण सरकारी पदव्या, किताब, नौकरी मागणे चुकीचे आहे. या मागणीतून आपण आपल्या गुलामगिरीला पाठिंबा देत आहोत, म्हणून हा ठराव संमत करण्यात येऊ नये. सोमण यांच्या या हरकतीने परिषदेत काहीशी चलबिचल सुरू झाली. सरते शेवटी परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणा करिता उभे राहिले. उपस्थित जनतेने त्यांच्या जय जय काराच्या घोषणा दिल्या. डॉ. बाबासाहेबांनी सोमण यांनी घेतलेल्या हरकतीस प्रखर विरोध केला. आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेबांनी सांगितले की,... अस्पृश्य समाजाच्या हातात सत्ता व संपत्ती जसजशी अधिक येत जाईल तसतशी त्यांची प्रगती होत जाईल. जे. पी. होणे किंवा आमदार होणे ही प्रगती घडवून आणण्याची साधने होत व ती आम्ही हाती घेतलीच पाहिजे. भारत परकियांच्या गुलामीत कसा गेला, बहिष्कृत समाज गुलाम कसा राहिला याचे विश्लेषण त्यांनी केले. ब्राम्हणेतर समाज व बहिष्कृत समाजाला आपल्या गुलामीचे कारण कळून चुकले आहे. तेंव्हा या दोन्ही समाजाने एकत्र येऊन आत्मप्रगतीची चळवळ चालविली तर ते पांढरपेशा वर्गाच्या गुलामीतून नक्कीच मुक्त होतील .

भाषणाच्या शेवटी डॉ. बाबासाहेबांनी सांगितले की, अस्पृश्य समाजास या पांढरपेशा वर्गा पासून दूर ठेवणे मी माझे कर्तव्य समजतो. कारण मी माझ्या आंधळ्या जनतेच्या हातातील काठी आहे. या काठीच्या आधारे माझी जनता प्रगतीची वाट चालू लागली तर ती कधीही खड्ड्यात पडणार नाही.

रहिमतपूर येथील आताच्या बौद्ध जनतेने डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या या ऐतिहासिक संदेशाने आपली प्रगती करणे काळाची गरज आहे. डॉ. बाबासाहेबांनी रहिमतपूर गावाला दिलेल्या भेटीचे हे शताब्दी वर्ष आहे , या वर्षभरात गावकऱ्यांनी विविध कार्यक्रमांचे आयोजन करून या संदेशाचा प्रचार, प्रसार करावा व नवीन पिढी समोर हा इतिहास जागृत ठेवावा. रहिमतपूर विषयक इतिहासात अनेक लहान, लहान घटना आलेल्या आहेत पण ‘भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या गावी येऊन गेले’ असा साधा उल्येख कोठेच केला गेला नाही. या सभेस धनाजिभाई आलेले होते ही बाब सुद्धा काही लहान नाही. त्या काळातील ब्राम्हणेतर चळवळीचे ते फार मोठे पुढारी होते, पुढे त्यांनी स्वतःचा पक्ष स्थापन केला, मुंबई प्रांताचे पहिले प्रधानमंत्री झाले, मात्र रहिमतपूरचा इतिहास लिहणाऱ्या लेखकांनी या बाबीकडे दुर्लक्ष केले. अर्थात लेखकांनी असे वागणे बरे नव्हे. ■ ■





जयसिंग वाघ
मो.9881928881

# अवघ्या 68 वर्षात तुकडोजी महाराजांच्या इतिहासाचे विकृतिकरण



राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे महानिर्वाण होऊन अवघे 58 वर्षच झाले. गुरुदेव भक्तांचे नविन नविन प्रयोग, चमत्कारीत मांडणी पाहुण तसेच नवा अभ्यासकांची टोळी पाहुन सावरकरांचा जिवनयोगी खरा कि नवी अभ्यासकांनी केलेले संशोधन खरे हि शंका निर्माण झाली आहे. सारेच अभ्यासक इतिहासाला किंवा नायकाला न्याय देणारे असतील असे नाही काही विकृत मानसिकतेचे वाहक असतात. गुरुदेव परिवारात हि विकृती अवघ्या 58 वर्षात कशी फोफावली याचे नवल वाटते कारण महाराजांना अनुभवणारी पिढी अजुन जिंदी आहे. विपर्यासाकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे परिणाम कीती भयंकर होतात ते तुकाराम महाराजांचे वैकुंठगमन नसुन खुन झाला हे आजही समाज हे मानायला तयार नाही. सभांजी महाराज अश्याच विकृतिचे बळी पडले. महात्मा फुले, गांधी याच विकृतीमुळे रोज मरत आहे. समाजामधे सतत धडगुस घालणारा किंवा बहुजन संताचे दैवीकरण करुन विचार मागे खेचणारा वर्ग अलीकडे फार अँक्टिव झालेला दिसतो. तुकडोजी महाराजांचा स्वतंत्र विचार असतांना निव्वळ अणुकरण म्हणुन रामधुनमधे नाच, दिंड्या, लेझिम, विविध पोषाखांची स्पर्धेची सुरवात झाली.भविष्यात रामधुन मधे काही नकटे डी.जे लावतील. बऱ्याच कार्यक्रमाचे आयोजन मुळ उद्देशापासुन दुर गेलेला दिसतो. काही गुरुदेव भक्त अनावश्यक भाकड मनोरंजक कथा सांगुन पोटार्थी झाले आहे. वं. महाराज झोपी गेलेल्या बहुजन समाजाचा सद्भविवेक जागृत करणार व्यक्तिमत्व होत. गुरुदेव भक्तांनी कहरच केला आहे. ग्रामजयंती कशी साजरी करावी हे स्पष्ट लिहुन ठेवल असतांना चमत्कारिक पद्दतीचे देखावे नाच गाणे दाखवणे सुरु केले आहे तसेच एका सुशिल भक्तांनीतर तुकडोजी महाराज कृपाकींत असुन चक्क मांडीवर बसलेले दाखविले उद्या ते स्वतः तुकडोजी महाराजांच्या मांडीवर बसलेले दिसेल. लुंगी मधे नंगा नाच सहज करता येतो. गुरुदेव भक्तांची मनसोक्त विकृती प्रामाणीक अभ्यासक महाराजांना मानणारा जिंदे भक्त कसे सहन करत आहे हेही नवल आहे. पुरस्कार मिळविण्यामध्ये किंवा सत्कार स्विकारण्यामधे व्यस्त आहे हे कळत नाही. गुरुदेवांची शिर्ष संस्था असल्या सुशिल भक्तांचे लाड करीत असेल व विकृती सहन करीत असेल तर विचारांचे प्रचंड नुकसान होईल महाराजांच्या विचारांना राख फासल्यासारखे होईल. त्याचे बळी छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले, महात्मा गांधी ठरले. यांची प्रतिमा सुधारण्यासाठी पुढील कित्येक वर्षे लागणार आहे. पुढचा क्रम तुकडोजी महाराजांचा दिसतो आहे. उतारेच्या उतारे वॉटस्यापवर टाकून ज्ञान दिल्यापेक्षाअसल्या विकृतीवर तुटुन पडा. डॉ. बाबासाहेबांचा परिवार जिंदा आहे. आम्ही जिंदे आहोत हे दाखवा. ■ ■

अशोक यावले
मो. 9822265268





स्वाभिमानाचे स्मरणशिल्प १३६

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा शिंगणूर ता. रावेर जि. पुणे

शिंगणूर : ता.रावेर जिल्हा जळगाव अतिशय छोटेसे गाव असून या गावांमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे या पुतळ्याचे उद्घाटन समाज कल्याण मंत्री रामदासजी आठवले यांनी केले होते. गावांमध्ये केळी उत्पादक व केळी कामगार राहतात शेतकरी व शेतमजूर यामध्ये सर्व धर्माचे लोक आनंदाने राहतात हा भाग कृषीप्रधान असल्यामुळे या भागात सर्वच शेतीवर अवलंबून आहे. चार ही बाजूने केळीची बाग हिरवाई दिसते.

संवाद मित्र, दिलीप कांबळे
मो.9860730341

# जाईबाई चौधरी ज्यु. कॉलेजच्या मुलींची बारावी बोर्डात उंच भरारी

नागपूर : स्थानीय जाईबाई चौधरी जूनियर कॉलेज, मंगळवारी बाजार, सदर नागपुर येथे आज बारावी बोर्ड परीक्षेत मुलींनी 100टक्के निकाल लावून दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा जाईबाई चौधरी ज्ञानपीठाची परंपरा कायम ठेवली. प्रमुख म्हणजे गरीब परिस्थिती, हलाखीचे जीवन जगणार्या आई-वडिलांच्या या मुली आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी जाईबाई चौधरी ज्ञानपीठात येवून यशासाठी अतोनात प्रयत्न करतात. आचार्य सुधाकर चौधरी सरांच्या मार्गदर्शनात स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी त्या संकल्प करून यश विळविण्यासाठी त्या उंच उंच भरारी घेतात.

प्रसंगी आचार्य सुधाकर चौधरी सर यांनी यू.पी.एस.सी., बँकिंग व इतर स्पर्धा परीक्षांच्या तयारी तसेच भविष्यातील येणार्या





आव्हानांसाठी कसा संकल्प करावा आणि आपली गरीबी व आर्थिक समस्या दूर करण्यासाठी कसा प्रयत्न करावा याबाबत मार्गदर्शन केले.

महाविद्यालयातून प्रथम क्रमांक दिव्या दिपक वाकोडे 88.33त्न(वाणिज्य) हिने पाली विषयात 100 पैकी 100 गुण मिळविले, हिला बँक स्पर्धा परीक्षेची तयारी करून बँकेत अधिकारी बनायचे आहे, साक्षी राजेश पाचारे 87टक्के (कला) हिने फाइन आर्ट्स मध्ये आपले भविष्य साकार करण्याची तयारी दर्शविली, स्नेहा पुंडलिक खोब्रागडे 85टक्के (वाणिज्य) हिलासुद्धा बँक स्पर्धा परीक्षेत यश मिळवून अधिकारी बनायचे आहे, गायत्री गजानन बोरसरे 82टक्के (कला) एम.पी.एस.सी. परीक्षेत यश मिळवून अधिकारी बनण्याचे तिने ठरविले, वैष्णवी भारत बांगडे 78टक्के (वाणिज्य), ग्रीष्मा गोविंदा सूर्यवंशी 75टक्के (वाणिज्य), ऋतुजा दिनेश खडसे 73टक्के (वाणिज्य), साक्षी नागोराव चवरे 72टक्के (वाणिज्य), कशिश सुनील वासनिक 71टक्के (वाणिज्य), मीनाक्षी गुलशन पाटील (वाणिज्य) 70टक्के मिळवून यांनी आपल्या मजुरी करणाऱ्या आई वडिलांना आनंदाचा एक श्वास दिला.

कला व वाणिज्य महाविद्यालयातून गुणवत्ता प्राप्त व सर्व उत्तीर्ण विद्यार्थिनिंचे अभिनंदन संस्थेचे सचिव आचार्य सुधाकर चौधरी सर, माजी प्राचार्या / संचालिका प्रभा चौधरी, कॉलेजच्या प्राचार्या अर्शिया पठान, प्रा. सुदत्त मेश्राम, प्रा. सुरेश सुखदेवे, प्रा. अनिता धारगावे, प्रा. अंजली पाटणे यांनी विद्यार्थ्यांच्या यशासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तणाव

# माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांचा यवतमाळ दौरा रद्द

यवतमाळ, : प्रतिनिधी : भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांचा यवतमाळ येथील नियोजित कार्यक्रम अखेर रद्द करण्यात आला. आंबेडकरी संघटनांच्या तीव्र विरोधाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शहरात विविध ठिकाणी लावण्यात आलेले कार्यक्रमाचे बॅनर्स काही ठिकाणी नागरिकांकडून उतरवण्यात आले. या घटनेनंतर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासन सतर्क झाले होते.या दौऱ्याला आंबेडकरी संघटनांकडून विरोध व्यक्त करण्यात येत होता. काही दिवसांपूर्वी घडलेल्या एका घटनेच्या निषेधार्थ विविध संघटना आक्रमक झाल्या होत्या. त्यामुळे संभाव्य उद्रेकाची भीती लक्षात घेऊन आयोजकांनी कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, शहरात पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला असून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या घटनेमुळे यवतमाळमध्ये काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

## यवतमाळात भूषण गवई यांच्या निषेधार्थ बॅनर्स उतरवले; आंबेडकरी समाज आक्रमक





यवतमाळ : यवतमाळ शहरात भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या विरोधात आंबेडकरी समाजाने तीव्र निषेध नोंदवित विविध ठिकाणी लावण्यात आलेले बॅनर्स उतरवण्यात आले. या घटनेमुळे शहरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. माहितीनुसार, ॲड. नरेंद्र मेश्राम व त्यांच्या पत्नी यांनी लावलेल्या बॅनर्सवरून वाद निर्माण झाला. काही कार्यकर्त्यांनी त्यांच्या घरी जाऊन 'बॅनर का लावले?' याबाबत जाब विचारल्याची माहिती समोर आली आहे. या निषेध आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते रविंद्र टेंभुर्णे, ॲड. जयसिंग चव्हाण, उमेश मेश्राम, प्रमोदिनी रामटेके, संजय बोरकर, नारायण थुल, राजा गणवीर, ॲड. किर्रदक, ॲड. रामदास राऊत, धनंजय मानकर, ॲड. राहुल पाटील आदींसह अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. आंबेडकरी समाजाच्या वतीने शहरभर निषेध व्यक्त करत संबंधित बॅनर्स काढून टाकण्यात आले. या घटनेनंतर प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवले असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना केली आहे.

## महत्वाचे

### बसपातर्फे दीक्षाभूमीवर बुद्ध जयंती





नागपूर : विश्वशांतीचे प्रतीक तथागत गौतम बुद्ध यांची 2589 वी जयंती बहुजन समाज पार्टीने दीक्षाभूमी येथे साजरी केली. बसपाच्या कही हम भूल न जाये या राष्ट्रीय अभियानांतर्गत दीक्षाभूमीवरील तथागत बुद्ध, डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याला व स्मारकाला पुष्पांजली अर्पण करून बसपा नेते उत्तम शेवडे, अभिलेश वाहाने यांच्या प्रमुख उपस्थितीत महापुरुषांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवा नेते सदानंद जामगडे, संचालन सहदेव पिल्लेवान यांनी तर समारोप शामराव तिरपुडे यांनी केला. कार्यक्रमाला सुधाकर रंगारी, प्रवीण पाटील, किशोर थूल आदी प्रमुख कार्यकर्ते व महिला कार्यकर्त्या प्रामुख्याने उपस्थित होत्या.

### महाराष्ट्र दिनी विदर्भात काळे झेंडे

#### स्वतंत्र विदर्भाच्या मागणीसाठी तीव्र आंदोलन





नागपूर : 1 मे महाराष्ट्र दिन निमित्त विदर्भातील अकरा जिल्ह्यांतील सुमारे एकशे एकवीस तालुक्यांमध्ये काळे झेंडे फडकावून निषेध नोंदविण्यात आला. 'स्वतंत्र विदर्भ राज्य' या मागणीसाठी विविध ठिकाणी निषेध सभा घेण्यात येऊन विदर्भावर होत असलेल्या अन्याय व कथित लूटमारीविरोधात तीव्र आक्रोश व्यक्त करण्यात आला.नागपूरातील शहीद चौक, इतवारी परिसरातील विदर्भ चंडिका येथे आयोजित कार्यक्रमात विदर्भ राज्य आंदोलन समितीचे जिल्हा उपाध्यक्ष गुलाबराव धांडे यांनी उपस्थित नागरिकांसमोर स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीचा अभ्यासपूर्ण दावा मांडला. 'महाराष्ट्र दिनीच वेगळ्या विदर्भाची मागणी का केली जाते, याची दखल घेऊन केंद्र सरकारने भारतीय राज्यघटनेचे कलम 3 चा वापर करून तत्काळ स्वतंत्र विदर्भ राज्याची निर्मिती करावी,' अशी मागणी त्यांनी केली. या आंदोलनात प्रा. प्रभाकर कोंडतुंबवार, गणेश शर्मा, अण्णा राजेधर, मुकेश मसुरकर, नरेश निमझे, तारेश दुरुगकर, घनश्याम पुरोहित, अग्रवाल, महेश नंदनवार, पाटील, प्यारुभाई, मौदेकर, तात्यासाहेब मते यांच्यासह अनेक पदाधिकारी, स्वातंत्र्य सेनानी, कार्यकर्ते तसेच महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### द बुद्धा एंड हिज धम्मा धम्मग्रंथाचे दीक्षाभूमी येथे प्रकाशन





नागपूर : त्रिगुण पावन पौर्णिमेच्या पर्वावर दीक्षाभूमी येथे एका साध्या कार्यक्रमात बुद्धा एंड हिज धम्मा (क्रांती प्रतिक्रांती, कालमार्क्स) या धम्म ग्रंथाचे आदरणीय भंते आर्य नागार्जुन सुरई ससाई अध्यक्ष दीक्षाभूमी स्मारक समिती, सुधीर फुलझेले, सुप्रसिद्ध अधिवक्ता शैलेश नारनवरे, न्यायाधीश विजय धांडे, ओकारेश्वर काकडे, श्रेय डबारे, नंदेश्वर, देवीदास घोडेस्वार, डॉ. पी.एस. चांगोले, डॉ. कोसनकर, मिलिंद बौद्ध, डॉ. नीलकंठ यावलकर, धर्मेश प्रसेनजीत (फुसाटे), सूर्यभान वैद्य, गणेश पाटील इतर मान्यवराचे उपस्थित प्रकाशन करण्यात आले. ग्रंथ हिंदीमध्ये असून किंमत 500 आहे. धम्मग्रंथाचे करता या मोबाईल क्रमांक वर संपर्क साधू शकता. मो. 8788848532, 9850399506, 9561976678

## निधन वार्ता

### नारायणराव निकोसे



नागपूर : न्यू कैलाशनगर मनोहर निकोसे यांचे वडील नारायणराव निकोसे वय 102 वर्षे यांचे 3/05/2026 रोजी प्लॉट नंबर 05, न्यू कैलाश नगर, नागपूर त्यांच्या निवास स्थानी निधन झाले. त्यांच्यावर मानेवाडा घाट येथे 04/05/2026रोजी दुपारी अंत्य संस्कार पार पडला. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, सुना, मुलगी, जावई आणि नातवंडे आहेत.

## बुद्ध जयंती निमित्त कवी संमेलन



नागपूर : जयभीमनगर बुद्ध विहार येथे बुद्ध जयंतीनिमित्त कवींचे कवी संमेलन आयोजित केले. कवी संमेलनाचे आयोजन जय भीम नगर बुद्ध विहार कमिटी अध्यक्ष सन्मा. प्रकाश चौरे, उपाध्यक्ष सुभाष सहारे, सचिव सुभाष कांबळे आणि संपूर्ण कमिटी सदस्य यांनी केले असून कवी संमेलनाचे अध्यक्षपद सन्मा. प्रभाकर तांडेकर निवृत्त शिक्षक, ज्येष्ठ कवी, आंबेडकरी विचारवंत यांनी भुषविले असून, कार्यक्रमाला ज्येष्ठ कवी म्हणून चरणदास वैरागडे, संजय सायरे, रंगराज गोस्वामी, पोर्णिमा मेश्राम, ज्योत्स्ना बनसोड, माधुरी वसंत शोभा, प्रकाश बावनगडे, संजय गोडघाटे, रजनी संबोधी, सुषमा कळमकर, प्रतिभा सहारे, इत्यादी कवीने आपली उपस्थिती दर्शविली. या सर्व कवींनी कवितेच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे काम केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सन्माननीय प्रभाकर तांडेकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बुद्धांच्या विज्ञानाशी सुसंगत असलेल्या धम्माच्या तत्वावर समाजाने चालणे गरजेचे आहे. तसेच आपल्या कवितेतून आणि सर्व कवींनी कवितेतून समाजातील द्वंद, उदवेग, उद्भबोधक भूत, भविष्य, वर्तमान घडामोडीचा समाजाचा खरा चेहरा दाखवण्याचा प्रयत्न केला. आयोजकांनी या सर्व कवींचा सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. कवी संमेलनाचे संचालन रंगराज गोस्वामी यांनी केले असून, आभार सुभाष कांबळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संपूर्ण जय भीम नगर बुद्ध विहार येथील कमिटीने परिश्रम घेतले.



## अस्मिता बुद्ध विहार अस्मिता कॉलनी नरेंद्रनगर येथे डॉ. आंबेडकर जयंती

नागपूर : अस्मिता बुद्ध विहार अस्मिता कॉलनी नरेंद्र नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती प्रबोधना करिता इंजि. बाळूभाऊ रत्नपारखी यांना आमंत्रित केले. बुद्ध जयंती, प्रबोधना करीता प्रा. नीरज गणेश बोधी यांना आमंत्रित केले होते. मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली विविध सांस्कृतिक, बौद्धिक प्रबोधनात्मक, कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले . याकरिता संस्थेचे अध्यक्ष देवांगिनी कांबळे, सचिव वीरेंद्र अंबुलकर, सहसचिव पौर्णिमा लांडगे, सभासद सुमेध लोणे, नरेंद्र पाढेन, प्रतिभा तांबे, सल्लागार दौलत कांबळे. यांनी कार्यक्रम यशस्वी होण्याकरता परिश्रम घेतले.

## श्याम मानव यांचा आंबेडकरी चळवळीकडून नागरी सत्कार

यवतमाळ : आंबेडकरी चळवळीच्या वतीने प्रा. श्याम मानव यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यवतमाळ शहरातील सेलिब्रेशन हॉल येथे आयोजित कार्यक्रमात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. काही दिवसांपूर्वी भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी सहकुटुंब बागेश्वर महाराजांचे दर्शन घेतल्याच्या घटनेनंतर राज्यभरात अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली होती. या पार्श्वभूमीवर प्रा. श्याम मानव यांनी अंधश्रद्धेविरोधात ठाम भूमिका घेत समाजात प्रबोधन करण्याचे कार्य केल्यामुळे त्यांचा सत्कार



केला. यावेळी बोलतांना प्रा. श्याम मानव यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विज्ञाननिष्ठ व विवेकवादी दृष्टिकोन दिला असून समाजाने अंधश्रद्धेला विरोध करणे आवश्यक आहे. 'आंबेडकरी असणे म्हणजे केवळ जन्माने नव्हे, तर विचारांनी आंबेडकरी असणे महत्त्वाचे आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाला ॲड. जयसिंग चव्हाण, संजय बोकार, उमेश मेश्राम, प्रमोदिनी रामटेके, गोविंद मेश्राम, हेमंत कांबळे, ॲड. धनंजय मानकर, प्रा. अंकुश वाडे, ॲड. प्रशांत किकर, ॲड. रामदास राजत, आनंद भगत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या सत्कार सोहळ्यामुळे आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून विवेकवादी विचारांना बळ मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

रमाईवाडी येथे वैशाख पौर्णिमेनिमित्त प्रबोधन

## 'दु :खमुक्तीचा मार्ग मैत्रीभावात' तक्षशिला वागधरे



नागपूर : रमाई बुद्ध विहार, रमाईवाडी (श्रीनगर) येथे त्रिगुण वैशाख पौर्णिमेनिमित्त प्रबोधनपर कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी आयुष्यमती तक्षशिला वागधरे (धम्मसेविका व माजी जिल्हा परिषद सदस्य, नागपूर) यांना प्रमुख वक्ता म्हणून निमंत्रित केले होते.

कार्यक्रमाची सुरुवात गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण व दीपप्रज्वलन करून केले. विहाराचे अध्यक्ष आदिनाथ शामकुवर व सचिव रविंद्रनाथ वासे यांनी तक्षशिला वागधरे यांचे पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन स्वागत केले. आपल्या प्रबोधनात तक्षशिला वागधरे यांनी बुद्धांचे तत्त्वज्ञान, त्रिगुण वैशाख पौर्णिमेचे महत्त्व आणि बौद्ध धम्मातील आचरणाचे स्थान यावर सविस्तर मार्गदर्शन केले. 'विहारात येऊन केवळ वंदना करणे पुरेसे नसून त्या तत्त्वांचे आचरण करणेही तितकेच आवश्यक आहे. प्रत्येकाने मैत्रीभावनेने जीवन जगल्यास माणसाचे दुःख कमी होण्यास निश्चित मदत होते,' असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात सुषमा कांबळे, दीपाली वाघमारे व माया सोनटक्के यांनी स्वागतगीत सादर केले. संचालन शशि शामकुवर यांनी केले, तर आभार प्रदर्शन पुष्पा कांबळे यांनी मानले. यावेळी तेजस्विनी बुरबुरे यांच्या वतीने खीरदान व दयानंद कांबळे यांच्या वतीने फलदान करण्यात आले. समारोप गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली .

## तारासावंगा व उतारा येथे वैशाख पौर्णिमा कार्यक्रम उत्साहात

नागपूर : 'कहीं हम भूल न जाये' या उपक्रमांतर्गत प्रबुद्ध समाज समिती, तारासावंगा व शाखा विठ्ठलवाडी यांच्या वतीने तारासावंगा व उतारायेथे बुद्ध पौर्णिमा निमित्त कार्यक्रमांचे आयोजन केले. दोन्ही ठिकाणच्या सभेच्या अध्यक्षस्थानी वासुदेव डोंगरे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी दिलेल्या 22 प्रतिज्ञांचे पालन बौद्धांनी केले पाहिजे, असे सांगितले.



अंधश्रद्धा वाढविणाऱ्या प्रथांपासून दूर राहण्याचेही त्यांनी आवाहन केले. प्रमुख वक्ते गुलचंद रंगारी यांनी वैशाख पौर्णिमेचे महत्त्व स्पष्ट करताना ती त्रिगुण पौर्णिमा असल्याचे सांगितले. त्यांनी गौतम बुद्ध यांच्या पंचशील, चार आर्यसत्य व आर्य अष्टांगिक मार्गाचे आचरण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. सामाजिक कार्यकर्ते रमेश कठाणे यांनी बुद्धांच्या पहिल्या धम्मदेशनेपासून धम्माची सुरुवात झाल्याचे सांगत धम्मपालनाने जीवनातील दुःख दूर होऊ शकते, असे मत व्यक्त केले. विजय बाबू चिंचखेडे यांनीही समयोचित विचार मांडले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण केला. गुलचंद रंगारी यांच्या नेतृत्वात सामूहिक वंदना घेण्यात आली. रूपचंद नंदागवळी यांनी उपस्थितांना भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना व 22 प्रतिज्ञांची शपथ दिली. कार्यक्रमाचे संचालन प्रबुद्ध समाज समितीचे अध्यक्ष पी. आर. धोंगडे यांनी केले. त्यांच्या हस्ते उतारा येथील पाच उपासिकांना 'भगवान बुद्ध व त्यांचा धम्म' हा ग्रंथ भेट दिला. तसेच आयुष किशोर गायकवाड या विद्यार्थ्यास इंग्रजी व्याकरण व शब्दकोश देण्यात आला. तारासावंगा येथील पाच विद्यार्थ्यांना 'इंग्रजी कसे बोलाव' हे पुस्तक, तर सोहम धोंगडे यास इंग्रजी व्याकरण व डिक्शनरी भेट दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रामदास घोंगडे यांनी केले. शेवटी खीरदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाचा लाभ सुमारे 30 ते 35 उपासक-उपासिकांनी घेतला.

## बहुजन विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध : मंत्री अतुल सावे

नांदेड : बहुजन समाजातील वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षण, कौशल्य आणि स्वावलंबनाच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संधींचे नवे दालन उघडले जात आहे. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी डिजिटल माध्यमे अत्यंत प्रभावी ठरत आहेत, असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा 'वनार्टी'चे अध्यक्ष अतुल सावे यांनी केले. नांदेड येथील शंकरराव चव्हाण सभागृहात इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे आयोजित 'कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळावा' या कार्यक्रमात वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर यांच्या अधिकृत संकेतस्थळ डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.वनार्टी.इन (www.vanarti.in) व माहिती पत्रकाचे प्रकाशन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अतुल सावे होते. या प्रसंगी खा. अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, आ. राजेश पवार, आ. बाबुराव कोहळीकर, महापौर कविता मुळे, मेघना कावली, सोनाली मुळे, प्रशांत वावगे, डॉ. वसंत माने, मिलिंद नारिंगे तसेच प्रताप पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

आई सफाई कामगार तर वडील घर बांधकाम मजूर; गरिबीवर मात करत पेलले स्वप्न

# झोपडपट्टीतील सुपुत्राची 'लोकोपायलट' पदी झेप!

## जिद्दीला कष्टाची जोड

नागपूर : नशिबाचे रडगाणे न गाता, कष्टाच्या जोरावर आभाळाला गवसणी घालता येते, हे एका झोपडपट्टीतील तरुणाने सिद्ध करून दाखवले आहे. आई शारदा धनराज कोटंगले नागपूर महानगर पालिकेत ऐवजदार सफाई कामगार आणि वडील धनराज कोटंगले बांधकाम मजूर असताना, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अभ्यास करून या तरुणाने भारतीय रेल्वेमध्ये 'लोकोपायलट' (रेल्वे चालक) म्हणून नियुक्ती मिळवली आहे. त्याच्या या यशाने संपूर्ण परिसरात अभिमानाचे वातावरण असून, 'कष्टाला पर्याय नाही' याची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे.

संघर्षातून यशाचा मार्ग निघतो. नागपूर शहरातील एका अरुंद गल्लीत, छोट्याशा घरात राहणाऱ्या या



तरुणाचा प्रवास थक्क करणारा आहे. घरात अठराविश्व दारिद्र्य असतानाही शिक्षणाची ओढ मात्र कायम होती. आईचे कष्ट : आई पहाटेपासून रस्त्यांची सफाई करण्याचे काम करते. आपल्या मुलाने मात्र साहेब व्हावे, हे तिचे स्वप्न होते. वडिलांचा घाम : वडील दिवसभर बांधकाम साइटवर मजुरी करून कुटुंबाचा गाडा हाकत होते. जिद्द : घरात अभ्यासासाठी पुरेशी जागा नसल्याने हा तरुण तथागत बौद्ध विहारातील सार्वजनिक वाचनालयात तासनतास अभ्यास करायचा. यशाचे 'वास्तविक दर्शन'अनेकांना वाटते की मोठ्या पदावर जाण्यासाठी महागड्या क्लासची आणि पैशांची गरज असते. मात्र, या विद्यार्थ्याने स्वयंअध्ययन (Self-study) आणि जिद्दीच्या जोरावर रेल्वे भरतीची कठीण परीक्षा उत्तीर्ण केली. तांत्रिक कौशल्य आणि शारीरिक चाचणीतही त्याने बाजी मारली. आज त्याची लोकोपायलट पदी निवड झाल्याने, रेल्वेच्या इंजिनचे सारथ्य आता एका कष्टकऱ्याचा मुलगा करणार आहे. 'माझ्या आईच्या हातातील झाडू आणि वडिल्याच्या हातातील फावडा थांबविणे हे माझ्याकरिता स्वप्न मनात ठेवून डॉ. बाबासाहेब हेच माझे प्रेरणास्थान होते. त्यांच्या कष्टाचे चीज झाले, याचा मला सर्वाधिक आनंद आहे.' अशी प्रतिक्रिया नवनियुक्त लोकोपायलट सुजल शारदा धनराज कोटंगले यांनी व्यक्त केल्या, या यशामुळे परिसरात कौतुकाचा वर्षाव होत असून या यशाची बातमी समजताच झोपडपट्टी परिसरात फटाके फोडून आणि पेढे वाटून जल्लोष करण्यात आला. 'परिस्थिती आडवी येत नाही, जर तुमची जिद्द मोठी असेल,' अशा भावना शेजाऱ्यांनी व्यक्त केल्या. एका सफाई कामगाराचा मुलगा आता रेल्वे चालवणार, ही बाब परिसरातील इतर विद्यार्थ्यांसाठी मोठी प्रेरणा ठरत आहे. या प्रसंगी आदर्श माध्यमिक शाळेतील शिक्षक प्रतीक मेश्राम, मेंढे, याचे सह नागपूर महानगर पालिका झोनल अधिकारी भोला खोब्रागडे, महानगर महामंत्री (अनुसूचित जाती मोर्चा ) इंद्रजित वासनिक, नागपूर जिल्हा महानगर कामगार संघ सचिव मंगेश गोस्वामी स्वास्थ निरीक्षक गौतम मेश्राम यांनी पुषगुच्छ आणि मिठाई देऊन शुभेच्छा दिल्या.

## रत्नबोधी बुद्ध विहारात बुद्ध जयंतीनिमित्त प्रबोधन





### धम्म म्हणजे नीतीमूल्यांचा मार्ग

नागपूर : विवेकानंद नगर येथील रत्नबोधी बुद्ध विहारात बुद्ध जयंतीनिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत बुद्ध धम्म आणि उपासकांची कर्तव्ये' या विषयावर प्रबोधनपर कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. योगिनी मेश्राम होत्या. प्रमुख अतिथी दैनिक बहुजन सौरभच्या निवासी संपादक संध्या राजूरकर तर विशेष अतिथी डॉ. वैशाली चिवंडे उपस्थित होत्या. यावेळी वक्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टिकोनातून गौतम बुद्ध यांच्या धम्माचे महत्त्व स्पष्ट केले. 'धम्म म्हणजे केवळ पूजा नसून तो नीतीमूल्यांचा मार्ग आहे. प्रज्ञा, करुणा आणि समता ही बुद्ध धम्माची त्रिसूत्री आहे,' असे सांगण्यात आले.

प्रबोधनात बुद्धांच्या संयम व करुणेचे उदाहरण देताना, अपमानास शांततेने उत्तर देण्याची शिकवण देण्यात आली. आजच्या समाजातील वाढता द्वेष, वाद-विवाद आणि सोशल मीडियावरील नकारात्मकता यावर भाष्य करत, 'खरे बुद्ध अनुयायी होण्यासाठी विवेक, संयम आणि शांततेने वागणे आवश्यक आहे,' असे मत व्यक्त केले. उपासकांची कर्तव्ये स्पष्ट करताना पंचशील पालन, शिक्षणाचा प्रसार, समतेसाठी कार्य आणि समाजसेवा यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात उपस्थितांनी आत्मपरीक्षण करून बुद्धांच्या तत्त्वांनुसार जीवन जगण्याचा संकल्प केला. 'बुद्ध जयंती म्हणजे केवळ उत्सव नसून विचारांची क्रांती आणि जीवनातील परिवर्तन आहे,' असा संदेश देत कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला सचिव अभय नाईक, सहसचिव त्रिरत्न वाळके, कोषाध्यक्ष विनय वासनिक, कार्यकारी सदस्य वैभव फुसाटे, राजेश आमटे, ज्योत्सना गजभिये तसेच कार्याध्यक्ष विनायक आमटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अभय नाईक यांनी केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648